



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक २१४ * नांदेड * रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# दिल्लीत झोपडपट्ट्यांवर १०० फुटी भिंत कोसळली, दोन चिमुरड्यांसह आठ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीच्या दक्षिण–पूर्व भागातील जैतपूर परिसरात रक्षाबंधनाच्या दिवशी (शनिवार, दि. ९ ऑगस्ट) सकाळी साडेनऊच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली. समाधी स्थळावरील सुमारे १०० फुट लांबीची भिंत अचानक कोसळून तिच्या खाली असलेल्या झोपड्यांचा चेंदामेंदा झाला. त्यामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन पुरुष, दोन महिला आणि दोन लहान मुलींचा समावेश आहे. या ठिकाणी अद्याप बचावकार्य सुरु आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भिंत कोसळल्याने जवळील अनेक झोपड्या मलब्याखाली दबल्या गेल्या. घटनास्थळी दिल्ली पोलीस, अग्निशमन दल, एनडीआरएफ व स्थानिक प्रशासनाची पथके तातडीने दाखल झाली. बचाव मोहिमेतून आठ जणांना बाहेर काढण्यात आले. त्यांना एम्स ट्रॉमा सेंटर आणि सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान आठ जणांचा मृत्यू झाला.

मृतांची ओळख पटली असून त्यात रुबीना (२५), डॉली (२५), रुखसाना (६) आणि हसीना (७) यांचा समावेश आहे. एक जखमी हिशबुल नावाच्या व्यक्तीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

डीसीपी साऊथ ईस्ट हेमंत तिवारी यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच पोलिस पथक ५ ते ७ मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आणि जेसीबीच्या साहाय्याने मलबा हटवून अडकलेल्यांना बाहेर काढण्यात आले. बचाव कार्य सुरू असून अजून कोणी दबले आहे, का याची पाहणी केली जात आहे.

फायर ब्रिगेड अधिकारी मनोज महलावत यांनी सांगितले की, भिंत समाधी स्थळावर बांधलेली होती आणि ती कोसळल्याने अनेक झोपड्या तिच्या खाली सापडल्या. या घटनेनंतर जिल्हाधिकारी दक्षिण–पूर्व डॉ. सरवन बगडिया, डीडीएमएची टीम आणि अन्य विभागांचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून सखोल चौकशी सुरू आहे.

# विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला; नदीकाठच्या गावांना इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शुक्रवार, दि.८ ऑगस्ट रोजी आठ रात्रीपासून शनिवार पहाटेपर्यंत पडलेल्या जोरदार पावसाने विष्णुपुरी प्रकल्पात पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे शनिवारी दुपारी ३ वाजता शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडण्यात आला असून त्यातून १५ हजार ५३८ क्युसेक्स पाणी विसर्जित होत आहे. गोदावरी नदीकाठी राहणाऱ्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



शनिवारी रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. अनेक ठिकाणी पाणी साचले होते. यामुळे सखल भागात असलेल्या घरांमध्ये पाणी शिरले. हदगाव तालुक्यातील काही गावांमध्ये ढगफुटीप्रमाणे पाऊस झाला. शनिवारी सकाळी ८ वाजेपर्यंत पाऊस सुरूच होता. नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प ९२ टक्के भरला आहे. सतत पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असल्यामुळे शनिवारी दुपारी ३ वाजता विष्णुपूरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडण्यात आला आहे. त्यातून १५ हजार ५३८ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग होत आहे. विष्णुपुरी प्रकल्पात पाण्याची आवक अशीच चालू राहिली तर रात्री उशिरा दुसराही दरवाजा उघडण्यात येऊ शकतो असेही सांगण्यात आले.

प्रशासनाने विष्णुपूरी प्रकल्पाच्या खालच्या भागात राहणाऱ्या सर्व नागरीकांना मालमत्तेचे आणि जिवीताचे नुकसान होवू नये यासाठी सजगतेचा इशारा दिला आहे.

## मालेगावजवळ ऑटो पलटी होऊन झालेल्या अपघातातील जखमी बालकाचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मालेगावजवळ ऑटो पलटी होऊन चार जण जखमी झाले होते. या जखमींपैकी अत्यवस्थ असलेला बालक अभिनंदन सचिन रहाटकर (वय ७ वर्षे) याचे दि.९ शनिवारी रोजी सकाळी उपचारादरम्यान निधन झाले आहे.



मालेगाव येथून अर्धापूरकडे येत असताना मालेगाव येथील पेट्रोल पंपाजवळ रस्त्यावरील खड्ड्यात पाणी साचल्याने रस्त्याचा अंदाज न आल्याने गुरूवारी ऑटो पलटी होऊन ऑटोमधील सचिन राहटकर (वय ३५ वर्ष), सौ. कुंता सचिन राहटकर (वय २८ वर्षे), कचराबाई राहटकर (वय ६० वर्ष), अभिनंदन सचिन राहटकर (वय ७ वर्ष) हे गंभीर जखमी झाले होते. जखमींवर नांदेड येथील शासकीय रुग्णालय उपचार सुरू होते. यातील जखमी अभिनंदन सचिन रहाटकर या बालकावर उपचार सुरू असतानाच निधन झाले आहे. अभिनंदन सचिन रहाटकर या बालकावर सायंकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

## सुधारित आयकर विधेयक सोमवारी लोकसभेत सादर होणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारने लोकसभेत १३ फेब्रुवारी रोजी सादर केलेले आयकर विधेयक, २०२५ मागे घेतले आहे. बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केलेल्या बहुतांश शिफारशींचा समावेश असलेले सुधारित आयकर विधेयक ११ ऑगस्ट रोजी लोकसभेत सादर केले जाणार आहे. संसद अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच निवड समितीने लोकसभेत आयकर विधेयक, २०२५ वरील अहवाल सादर केला होता. भाजप खासदार बैजयंत पांडा यांनी हा अहवाल सभागृहात सादर केला होता.

हे विधेयक का मागे घेण्यात आले? याबाबत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे की, योग्य कायदेविषयक अर्थ सांगण्यासाठी ज्या सूचनांचा समावेश करणे गरजेचे आहे, त्या प्राप्त झाल्या आहेत. त्यासाठी सरकारने हे विधेयक मागे घेतले आहे.

## नांदेडला मिळाले चार डीवायएसपी; इतवारा प्रशांत शिंदे तर धर्माबादला दशरथ पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील १५६ पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देऊन नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. यात नांदेड जिल्ह्याला चार उपविभागीय पोलीस अधिकारी मिळाले आहेत. त्यात इतवारा, धर्माबाद, भोकर, माहूर तसेच राज्य गुप्तवार्ता विभागात नवीन नियुक्त्या झाल्या आहेत. यामुळे जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेला नवे अधिकारी मिळाले असून कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नियुक्ती प्राप्त पदोन्नत अधिकाऱ्यांमध्ये प्रशांत शिंदे यांची इतवारा पोलीस उपविभागात, दशरथ पाटील यांची धर्माबाद, दगडू हाके भोकर तर दिनेश शेळके यांना माहूर येथे नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच राज्य गुप्त वार्ता विभागात राजेंद्र टाकणे यांना पाठविण्यात आले आहे. या बदल्यामुळे संबंधित भागात गस्तवाढ, गुन्हेगारीवर नियंत्रण आणि नागरिकांशी सुसंवाद याला नवी दिशा मिळेल अशी अपेक्षा या भागातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## निवडणूक आयोगाकडून ३३४ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील निवडणूक प्रक्रिया अधिक स्वच्छ आणि पारदर्शक बनवण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आयोगाने ३३४ मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली आहे. निवडणूक प्रणालीतील शुद्धीकरणाचा हा एक भाग असल्याचे आयोगाने म्हटले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, नोंदणीकृत राजकीय पक्षांनी प्रत्येक सहा वर्षांतून किमान एकदा तरी निवडणूक लढवणे अनिवार्य आहे, असे झाले नसल्याने नोंदणी रद्द करण्यात आली आहे.






## उत्तरकाशीत परिस्थिती बिकट! २५० लोकं अजूनही अडकलेले

**उत्तरकाशी (प्रतिनिधी)–** उत्तरकाशीच्या धारली गावात झालेल्या आपत्तीनंतर परिस्थिती अजूनही गंभीर आहे. धारलीकडे जाणारे सर्व रस्ते तुटले आहेत आणि वाहून गेले आहेत. लष्कर, आयटीबीपी, एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या पथके मदत आणि बचाव कार्यात सतत गुंतलेली आहेत. आतापर्यंत ९३१ हून अधिक लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे आणि ही संख्या सुमारे १००० पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. असे असले तरी, धारली आणि हर्षिल परिसरात सुमारे २५० लोक अजूनही अडकले आहेत, ज्यांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्याचे काम सुरू आहे.

# पुराच्या पाण्यामुळे शेलगावचा संपर्क तुटला

- पुलाची उंची वाढवण्याची गावकऱ्याची मागणी
- नदीकाठील गावांनी सतर्क रहावे, प्रशासनाचा इशारा

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शेलगावचा पुलावरून पाणी जात असल्यामुळे शुक्रवार, शनिवार असे दोन दिवस संपर्क तुटला. यामुळे शनिवारी राखी पौर्णिमेनिमित्त बहिणींना भेटीसाठी आलेल्या भावांना राखी न बांधताच परत जावे लागले. पुराच्या पाण्याकडे लक्ष देऊन पुलाची उंची वाढवावी अशी मागणी गावकऱ्यांतून होत आहे.



शेलगाव या गावाजवळून मेंढला नाला जातो. वरच्या भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला की, मेंढला नाल्याला पूर येतो. शेलगाव जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाची उंची कमी असल्यामुळे या पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे शेलगावचा दोन दिवसांपासून संपर्क तुटला आहे. या पुरामुळे अनेक गावकऱ्यांना गावातच अडकून पडावे लागले तर बाहेर गावाहून येणाऱ्यांनाही गावाकडे जाता आले नाही. त्यामुळे शनिवारी असलेल्या राखीपौणिमेनिमित्त भाऊ–बहिणींना भेट घेता आली नाही. याचबरोबर जोरदार पाऊस झाल्याने नदीपात्राच्या दोन्ही बाजूंनी असलेल्या शेतात पाणी शिरले आहे. तसेच स्मशानभूमी देखील पाण्याखाली गेली आहे.

शेलगाव येथील नदीच्या पुलाची उंची वाढवावी. सततच्या पुरामुळे गावकऱ्यांना ये–जा करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. या रस्त्यावरील फुलाची उंची वाढविण्यासाठी आमदारांनी लक्ष द्यावे अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष उद्धवराव राजेगोरे, मुंजाजी राजेगोरे, आत्तम राजेगोरे, छत्रपती राजेगोरे यांच्यासह गावकऱ्यांनी केली आहे.

## भारताच्या संरक्षण उत्पादनात विक्रमी वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताच्या संरक्षण उत्पादनात विक्रमी वाढ झाली आहे. भारताने २०२४–२५ या आर्थिक वर्षात एक लाख ५० हजार ५९० कोटी रुपयांच्या संरक्षण साहित्याचे उत्पादन केले. याआधी २०२३ – २४ या आर्थिक वर्षात भारताने एक लाख २७ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण साहित्याचे उत्पादन केले होते.

## विधानसभेच्या आधी दोन जणांकडून १६० जागा जिंकून देण्याची हमी; शरद पवार यांनी केला दावा

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिल्लीत असताना दोन जण विधानसभा निवडणुकीची ऑफर घेऊन मला भेटले. त्यांनी १६० जागा जिंकवून देण्याची हमी दिली. या दोन जणांना मी राहुल गांधींना भेटवून दिले होते. पण आता त्या दोघांचे नाव – पत्ते आणि संपर्क क्रमांक यापैकी काहीही माझ्याकडे नाही, असा धक्कादायक दावा शरद पवार यांनी केला आहे. एक पत्रकार परिषद घेऊन शरद पवारांनी हा दावा केला.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीआधी दिल्लीत दोनजण भेटले. त्यांनी राज्यात २८८ पैकी १६० जागांवर जिंकवून देण्याची हमी दिली होती. त्यावेळी मी त्यांची गाठ राहुल गांधी यांच्याशी घालून दिली. त्या लोकांना जे जे काही बोलायचं होतं, ते राहुल गांधी यांच्या समोर म्हटलं. आपण या प्रकारात पडू नये, असे आम्ही ठरवले. हा आपला रस्ता नाही, लोकांचा निर्णय असेल तो आपण स्वीकारू असा आम्ही विचार केल्याचे शरद पवार म्हणाले. निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत मनात काही शंका नाही. निवडणूक काळात अशी मोठी आश्वासनं देणारे अनेक भेटत असतात. त्याकडे मी तेव्हा दुर्लक्ष केले, असे शरद पवार म्हणाले.

### संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न –फडणवीस

विरोधकांनी कितीही संभ्रम निर्माण केला, तरी भारताइतक्या पारदर्शक आणि मुक्त पद्धतीने निवडणुका कुठेच होत नाहीत. ईव्हीएम आणि निवडणूक आयोग यांच्यावर आरोप करणारी मंडळी जनतेत बोलतात. पण निवडणूक आयोगाने बोलावल्यावर जात नाहीत. शपथपत्र द्यायला तयार नाहीत. सांगतात आम्ही संसदेत शपथ घेतली आहे. पण संसदेतील शपथ सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात चालते का? त्यांना माहिती आहे की, आपलं खोटं पकडलं गेलं तर उद्या तुमच्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते. त्यामुळे रोज खोटं बोलायचं आणि पळून जायचं, असे हे पळपुटे लोक आहेत, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.







# राखीची ओवाळणी

**(या बेगडी जगात आजही काही अशी माणसं आहेत, जी प्रामाणिकपणाचा दीपवत झगमगत राहतात ज्यांच्या अंतःकरणातील उजेड कोणत्याही लालसेच्या अंधाराला प्रवेश करू देत नाही. अशीच एक छोटीशी पण मन हेलावणारी गोष्ट आहे राजेंद्र नावाच्या एका साध्या, गरीब पण नीतिमान माणसाची...)**

राजेंद्र रोजच्या रोज रेल्वे स्थानकाजवळ कचऱ्यात फिरत असे. कोणती उपयोगी वस्तू सापडते का यासाठी त्याचा डोळा सदैव जागरूक असायचा. प्लास्टिकच्या बाटल्या, टिनचे डबे, जुनी पत्रं काहीही चालायचं. याचंच तो संकलन करून कबाडीत विकून त्याचा उदरनिर्वाह करत असे.

त्या दिवशीही तो आपलं पोतं खांद्यावर घेऊन स्टेशनच्या बाजूला कचऱ्यात शोध घेत होता. तेवढ्यात त्याच्या नजरेस एका कोपऱ्यात पडलेली एक तपकिरी रंगाची हँडबॅग आली. 'श्रीमंत माणसाची असेल, कदाचित नादुरुस्त म्हणून टाकली असेल,' असं त्याच्या मनात आलं. कारण त्याला चांगलं ठाऊक होतं, जे श्रीमंतांसाठी टाकाऊ, ते गरिबांसाठी मौल्यवान असतं. त्याला असंच कधीतरी कचऱ्यातून एक चांगली जोड चप्पल मिळाली होती, जी तो अजूनही वापरत होता.

कुतूहलाने आणि थोड्या हुरूपाने राजेंद्र त्या बॅगजवळ गेला. आसपास इतर कोणीही कबाडवाला नव्हता, हे पाहून त्याने ती बॅग उचलली. हँडल तुटलेलं होतं, पण बॅग स्वतः नीटसं होती. एखादा मोची सहज दुरुस्त करून देईल. त्याने चौफेर नजर फिरवली आणि मग बॅग उघडली. आणि क्षणभरासाठी त्याचं संपूर्ण विश्व स्तब्ध झालं.

बॅगच्या आत पाचशे रुपयांच्या नोटांचा एक जाडजूड बंडल होता. त्याशिवाय क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डही दिसले. एका गरिबाच्या दृष्टीने ही तर अक्षरशः लक्ष्मीची कृपा होती! पण या क्षणिक मोहाच्या लाटेवर स्वार होण्याऐवजी राजेंद्रच्या मनात विचारांचा पूर उसळला

'हे कार्ड्स तर नंतर अडचणीत आणू शकतात कुठेतरी कॅमेरा असेल, कोणी बघत असेल' आणि मग एक विचार त्याच्या मनात पक्का झाला.



या बॅगचा खरा मालक आज कदाचित खूप अडचणीत असेल, कदाचित औषधासाठी, कुटुंबासाठी, एखाद्या संकटासाठी हे पैसे अत्यंत महत्त्वाचे असतील.

तो तडक स्टेशन मास्टरच्या केबिनमध्ये गेला.

साहेब, ही बॅग मला ट्रॅकजवळ मिळाली. मी कबाड गोळा करत होतो तेव्हा.

स्टेशन मास्टरने त्याला कोपऱ्यात बसायला सांगितलं. समोर एक गृहस्थ चिंतेत बसलेले होते.

मिस्टर अजय, ही तीच बॅग आहे का जी आपण शोधत होता? स्टेशन मास्टरने विचारलं.

बहुतेक हो! माझ्या सहकारी मीनाक्षीची बॅग हरवली आहे. तिचं वर्णनही हिच्याशी जुळतंय त्यात तिचं आयडी कार्ड, डेबिट-क्रेडिट कार्ड्स आणि आजचं वेतन होतं, अजय म्हणाले, आणि राजेंद्रकडे थोड्या संशयाने पाहिलं.

हो, मी आत पाहिलं. बॅगमध्ये पाचशेच्या नोटांचा बंडल आणि दोन कार्ड्स आहेत, राजेंद्रनं प्रांजळपणे सांगितलं.

बॅग उघडून पाहिली असता त्यात मीनाक्षी सरदेसाईचं ऑफिस ओळखपत्र आणि कार्ड्स होते, नाव स्पष्ट लिहिलेलं होतं.

अजयजी, त्यांना फोन लावा. त्यांना सांगा की बॅग सुरक्षित आहे, आणि ओळख पटवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह यावं, स्टेशन मास्टर म्हणाले.

फोनवरून मीनाक्षी अगदी अश्रूंनी भरलेल्या आवाजात म्हणाली, मी लगेच येते. जरा थांबवा त्यांना. मला त्या व्यक्तीचे आभार मानायचेत. हे पैसे माझ्यासाठी फारच महत्त्वाचे आहेत.

राजेंद्र जाऊ दे म्हणाला, पण स्टेशन मास्टरने त्याला रोखलं.

तुमचा प्रामाणिकपणा आमच्यासाठी आदराचं कारण आहे. रेल्वे प्रशासनाकडून आम्ही तुम्हाला पुरस्कार देण्यासाठी शिफारस करू.

थोड्याच वेळात मीनाक्षी धापा टाकत पोहोचली. ती थोडीशी गडबडलेली होती.

माफ करा, ट्रॅफिकमुळे उशीर झाला.

तिने ओळख पटवून बॅग घेतली.

ती क्षणभर थांबली आणि हळुवारपणे म्हणाली,

आज रक्षाबंधन आहे. आणि तुम्ही माझ्या रक्षणासाठी देवदूतासारखे आलात. हा माझा पगार आहे कितीतरी महत्त्वाचा.

मी तुम्हाला काही द्यायचं ठरवलंय. खरं तर, तुमचं आभार मानणं अपुरं वाटतंय

असं म्हणत तिने आपल्या पर्समधून एक सुंदर राखी काढली आणि प्रेमळ हसत ती राजेंद्रच्या हातावर बांधली.

राजेंद्रने क्षणभर विचार करून त्याचा फाटलेला खिसा उचकटला. त्यात दहा रुपयांची एकच नोट होती. तो म्हणाला,

माझ्याकडे फक्त हेच आहे.

मीनाक्षीच्या डोळ्यांत पाणी आलं.

भाऊ, तुमचा प्रामाणिकपणाच माझ्यासाठी सर्वात मोठी ओवाळणी आहे.

तिने बॅग उघडली आणि दोन पाचशेच्या नोटा काढल्या.

मी मिठाई आणू शकले नाही, पण हे पैसे घ्या, स्वतःसाठी एखादी मिठाई तरी घ्या, ती म्हणाली.

राजेंद्र थोडा संकोचला. पण स्टेशन मास्टर आणि अजयने आग्रह केला.

या प्रेमातून मिळालेल्या भेटीला नकार देणं हेच अपमानास्पद होईल.


शेवटी राजेंद्रने पैसे घेतले आणि निःशब्दपणे खोलीच्या बाहेर पडला. त्याच्या डोळ्यांत समाधान होतं एक शांत प्रकाश.

मीनाक्षी खिडकीतून पाहत राहिली, तो दूर जात राहिला आणि तिच्या नजरेतून हळूहळू विरून गेला.

आजही अशी माणसं आहेत ज्यांच्यामुळे माणुसकी अजूनही शिल्लक आहे ती स्वतःशीच पुटपुटली.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# बदलत्या काळातील समकालीन परिमाणे : वर्तमानाचे फेसबुक




**पुस्तक परीक्षण**

**व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

माधव जाधव यांच्या प्रासंगिक लेखन शैलीत वेगळे वैशिष्ट्य आहे. काळा ,वेळ , पात्र व प्रसंग पकडण्याची त्यांची प्रतिभा कमालीची आहे. ते साहित्याबरोबर अनेक माणसं वाचण्यात वाकबगार आहेत. संवाद ,भेटीगाठी व स्थळ काळ यातून त्यांचे लेखन वेगळा संदेश देऊन जाते. बदलता काळ व त्या काळास ओळखण्याचे कसब त्यांच्यात आहे. आज वाचक संस्कृती मुळात लोप पावत आहे. लोकांना वाचनासाठी वेळ मिळत नाही. मोठी मोठी पुस्तके घेऊन आज वाचक वाचन करायला तयार नाही. अशा परिस्थितीत वाचकांच्या सवड व वेळ यांचे ते भान राखून आहेत. म्हणूनच वर्तमानाचे फेसबुक हा लघूकथा टाईप लेखसंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरतो. प्रत्येक लेख हा एक ते दोन पानात संपतो व सर्व लेख संदेशात्मक कथा वाटतात. त्यात बोध घेण्यासारखे सद्य स्थितीत वास्तवतेचे ज्वलंत उदाहरणे आहेत. ते सर्व काळाचं प्रतिनिधित्व करतात.

त्यातील लेख प्रत्येकाच्या अनुभवातील आजूबाजूला घडणाऱ्या घटना आहेत. पण त्यातील संदेश व कलात्मकता वाचकास विचारप्रवृत्त करायला भाग पाडताते.

आपणास दैनंदिन जीवन जगत असतांना आजूबाजूच्या परिस्थिचे भान या लेखात आलेले आहे. त्याबरोबर त्यांच्या संवेदनशील लेखातील तळमळ व तगमग त्यांच्या लेखनाची वास्तवता आहे.

त्यांच्या चिन्हांकित यादीतील माणसं ह्या कथासंग्रहास यंदा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या साहित्यकृतीचा महाराष्ट्रात वेगळा वाचक वर्ग आहे.

माधव जाधव यांची माणसं वाचण्याची कला व त्यांच्यावर भाष्य करण्याची कल्पकता सर्जनशील आहे. सामाजिक जाणीव व जागृती हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असते. त्यातल्या त्यात लेखकांचे ते अद्य कर्तव्य असते. ते त्यांच्या लेखनातून ते तंतोतंत पाळताना दिसते.

पुस्तक वाचून जगातली माणसं कळतात पण माणसं वाचली तर त्यांच्या आयुष्याचे एकंदरीत दुःख,दैन्य,दश्या व दिशा यांचा तंतोतंत अनुमान कळतो. ते अनुमान व अनुभव हे शब्दरूप घेऊन आले तर ते वाचकांच्या मनात घरत करतात. माधव जाधव यांच्या बाबतीत ते खरे ठरते.

व्यक्ती प्रवृत्ती, सामाजिक सांस्कृतिचे समकालीन वास्तव व त्यातील विदारकता हे या लेखन मालेतील मुख्य वैशिष्ट्ये आहे.

शेतकरी कुटुंबातील वाढत्या आत्महत्या त्यामुळे होणारी कौटुंबिक वाताहत यावर उपाय म्हणून आत्महत्या करणार नाही , असे शपथपत्र हा अनोखा उपक्रम शपथपत्र या पहिल्याच लेखात लेखकांनी मांडलेला आहे. तो उपक्रम ते कृतीतून पूर्ण करतात. प्रत्येक मुलांना आत्महत्या करणार नाही असे शपथपत्र वडिलांकडून लिहून आणायला सांगतात. तो उपक्रम यशस्वी होतो. कोणतीही वाईट घटना घडण्यापूर्वी ती घडणारच नाही, यासाठी योग्य ती उपाययोजना करणे यालाच परिवर्तन म्हणतात असा समर्पक संदेश या लेखातून लेखक देतात.

कष्टाचा आनंद या लेखात निर्भेळ जीवनाचा आनंद कसा घ्यावा हे भाजीपाला विकणाऱ्या बाईकडून मिळतो असे लेखकांनी मांडलेले आहे. खंडाने शेती करत भाजीपाला विकून चार लेकीचे लग्न चांगल्याघरी करुन दिले यांचे समाधान पण मुलगा शिकला नाही याची खंतही भाजीपाला विकणारी बाळगून आहे. तरी तिचं जगणं आनंदी आहे. यातून शेती करून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना आनंदी जीवन जगण्याचा ती संदेश देते.

मुलीला आई आवडणे कांही गैर नाही, पण मुलाला त्याची आई जवळ न राहता सासू जवळ राहावी वाटणं हे गैर आहे. एका आईची जीवघेणी फरफट अन् कथानक भेटलं या लेखातून समकालीन वास्तव सांगून जाते.

वस्तू चोरीला जावून ही लोक पोलिस स्टेशनला का जात नाहीत ? हे वास्तव सांगणारा अद्दल घडली हा लेख आहे. आपली वस्तू आपणास सांभाळता येत नाही का? मग यास पोलिस काय करेल ? हा प्रश्न आपली वस्तू जाऊन आपल्याच अनेक चौकशा टाळण्यासाठी लोक गेलेल्या वस्तूचे ओझे सहन करणे पसंत करतात. पण घरी गेल्यावर बाजारात जातांना मोबाईल नेत जाऊ नका ? असे बायकोचे टोमणे लेखकाला ऐकावे लागतात .

गरीब , होतकरू व शिकू पहाणारी मुलं यांना दत्तक घ्यावे अशा आव्हानाला मिळालेला प्रतिसाद यातून लेखक समजदार माणसांचे गुणगान करतात. संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज गावोगावी फिरले म्हणून त्यांना लोकांची प्रश्न कळाली. तसेच प्रत्येक सुजाण माणसांनी गावोगावी फिरावे तरच लोकांचे प्रश्न कळतील असा संदेश समजदार माणसे या लेखातून लेखक देतात.

मामाला बैलानं डिवलं . मामा दवाखान्यात दाखल होतो. मामाला व पोराला मानणारी माणसं दवाखान्यात येतात.

मामा बिमार अवस्थेत ही आपल्यासाठी येथपर्यंत आलेल्या लोकांना जेवणाची व्यवस्था करण्याचे मुलाकडे फर्मान सोडतात. लोक जेवण्यास नकार देतात. मग आपलं कर्तव्य म्हणून मुलगा त्यांना थंड स्प्राईट पाजवतो . स्प्राईटचे बिल हे एक्सरेच्या बिलायेवढे होते. जिव्हाळा व आत्मियता यामुळे असा वायफळ पैसा खर्च होतो. यांचे मोजमाप कोणी ठेवत नाहीत. ग्रामीण अर्थव्यवस्था ही मोठेपणा व आत्मियता यातच ढासळते आहे याचं दुःख लेखकाला वाटते.त्यामुळे बैल डिवल्याने कंबर मोडली यापेक्षा घरी आल्यागेल्या पाहुण्याची व्यवस्था करून मामा सारख्या शेतकऱ्यांची कंबर मोडते यांचं दुःख लेखकांनी कंबर मोडली या लेखात मांडलेले आहे.

खोट्या प्रतिष्ठेसाठी लाखो रुपये खर्चून लग्न करण्याची चढाओढ सद्य संस्कृतीत बळकावते आहे. लोक कमी पैशात लग्न उरकून घे ? असे म्हटले तर लग्न काय बार बार येते का हा प्रतिप्रश्न देऊन जाते. माणसाच्या वर्तनव्यवसायाबद्दलचे अनेक प्रश्न गंभीर बनत चालले आहेत. अशात करोनाने केलेल्या कहरातून या अनिष्ट परंपरेला कांही काळापुरता अंकुश बसला. पण तो सर्वांनी कायम पाळला तर खोट्या प्रतिष्ठेसाठी होणारे शोषन टळेल असे लेखकाला वाटते. करोनाचे विघ्न पण स्वस्त झाले महागडे लग्न असा संदेश तुम्हाला काय वाटते या लेखातून लेखक देतात.

दारिद्र्य, शेतकरी,नाते संबध, आईवडील , समाज , उत्सवप्रियता या सर्व बाबींवर सांगोपांग चर्चा लेखन वर्तमानाचे फेसबुक या पुस्तकातील एकविस लेखातून करतात.

सध्याच्या डोअर संस्कृतीत एकमेकांची ओळख बुडवणाऱ्या वर्तमानात लेखन मात्र तळमळीने अनेक वाईट प्रवृत्ती व सवयीवर सडेतोड कटाक्ष यातून करतात.

शहरीकरण व ग्रामीण जीवनाचे सहसंबंध व बदलत्या नातेसंबंधाचे वर्तमान या लेखातून वाचकाला अस्वस्थ करुन सोडते. शेतकरी आत्महत्या त्यावर उपाययोजना व कायमस्वरूपी तोडगा अशा अनेक लेखातून लेखक पोटतिडकीने मांडतात. शेतमजूर, बटाईदार कष्टाने आनंदी जीवन जगतात पण शेतरी मात्र या आनंदापासून दूर का राहतो? यांचे अनेक संदर्भ या लेखातून आलेले आहेत.

या बदलत्या काळात नात्यांची कुचंबणा व नात्यांची फरफट यावर ही लेखकांचे कटाक्ष आहेत. ते बदलत्या समकालीन जगण्यावर सटीक भाष्य करतात. चुका दुरुस्त करून जगण्याचा संदेश देतात. वर्तमानातील वर्तनव्यवस्थेवर कटाक्ष करणारे लेख वाचकांना अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडतात.

नाते संबंध, सामाजिक जान, संयम, संघर्ष व समन्वय या गोष्टी लेखातून शिकवतात. सामाजिक उलथापालथीत बेगडी चेहऱ्यावरील अनेक संदर्भ या लेखातून लेखकांनी मांडलेले आहेत.

बदलत्या काळातील समकालीन परिमाणे अधोरेखित करणारे हे लेख सर्वांनी वाचावेत इतके बोधप्रद आहेत.

डॉ.वासुदेव मुलाटे यांची पाठराखण या लेखाचा सकारात्मक दृष्टिकोन वाचकांपुढे ठेवते.

**पुस्तक: वर्तमानाचे फेसबुक**
**लेखक: माधव जाधव**
**किंमत:१२५/-**
**पृष्ठे:८६**
**प्रकाशन-संस्कृती प्रकाशन, पुणे**

# भाऊबहिणीचे अमर नाते



राखी पौर्णिमेला बहिणी आल्या माहेराला,
ओवाळूनी आरती, राखी बांधते भावाला।
अमर आहे नातं, भाऊ-बहिणीचं जीवाला,
अरुणावतीमध्ये प्रेम होतं कृष्ण-द्रौपदीला।

भर सभेमध्ये वस्त्र पुरवलं बहिणीला,
ओवाळून आरती, राखी बांधते भावाला।।

वनामध्ये हाल होते गोपीचंदाचे,
मुखामध्ये नाव घेतो तो चंपा बहिणीचे।
डोळ्यांमध्ये पाणी, दुख सांगतो बहिणीला,
ओवाळूनी आरती, राखी बांधते भावाला।।

निवृत्ती, सोपान, मुक्ताबाईचे ज्ञानदेव बंधू,
हट्ट पुरवी बहिणीचे, बंधू प्रेम वाटे या मुक्ताबाईला।
बंधुत्वाचं हे नातं पवित्र झालय त्या काळाला,
ओवाळून आरती, राखी बांधते भावाला।।

जनीवरी प्रेम होतं चांगदेव महाराजांचे,
जनीसंगे नातं झालं, दुग्धासम बहिणीचे।
शिरीतिर घेऊनिया, रसियले ती बहिणीला,
ओवाळून आरती, राखी बांधते भावाला।।

जगी एक नातं आहे, जोडा भाऊ-बहिणीचे,
श्रावण महिन्यामध्ये, पावित्र्य राखी पौर्णिमेचे।
'राधेश्याम' म्हणे, साऱ्या बहिणींला,
ओवाळून आरती, राखी बांधते भावाला ।।

**-इंदुताई कुंडलिकराव आवटी**
नाशिक
मो. ९४२३१७३३ ४५

# हिंदी चांगलीच, पण सक्ती नको

भारतीय राजकारणात गेल्या काही दशकांत प्रादेशिक पक्षांनी आपले स्थान टिकवण्यासाठी एक खास तंत्र विकसित केले आहे, ते आहे ओळखीच्या राजकारणाचे. हे राजकारण भाषिक अस्मिता, जात, प्रांत आणि अगदी अन्नाच्या सवयींपर्यंत पोहोचले आहे. आणि या राजकीय अस्तित्वाच्या लढाईत 'हिंदीचा जबरदस्तीने लादण्याचा' मुद्दा वेळोवेळी पुढे केला जातो. विशेषतः निवडणुका जवळ आल्या, की दक्षिण भारतातील काही नेत्यांना हिंदीविरोधाची आठवण होते, जणू त्यांचे राजकीय भवितव्यच त्यावर अवलंबून आहे.

**भाषेचा मुद्दा की राजकारणाचा बहाणा?**

तमिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र आणि केरळ या राज्यांतील काही नेत्यांनी पुन्हा एकदा केंद्र सरकारवर हिंदी लादण्याचा आरोप केला आहे. विशेष बाब म्हणजे, असा कोणताही कायदा किंवा केंद्राचा आदेश अस्तित्वात नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणात तीन भाषांचा पर्याय दिला जातो, आणि त्यात कोणती भाषा निवडायची हे राज्यांवरच सोडण्यात आले आहे. हिंदीला केवळ एक कार्यकारी भाषा म्हणून प्रोत्साहन देण्यात येत आहे, लादले जात नाही. मग इतका विरोध का? कारण हिंदी ही आता फक्त एक भाषा नाही, ती 'एकात्म भारत' या मोदी सरकारच्या संकल्पनेचे प्रतीक बनली आहे आणि ही संकल्पना प्रादेशिक पक्षांच्या राजकीय गणितासाठी धोका ठरू शकते.

**भाषिक विविधतेचा सन्मान, विरोध नव्हे**

भारत ही एका भाषेची, एका जातीची, एका धर्माची रचना नाही. ही विविधतेतील एकतेची रचना आहे. आपल्या राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीत २२ अधिकृत भाषा मान्यता प्राप्त आहेत. त्यात हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड अशा सर्वांचा समावेश आहे. मग एखादी भाषा दुसऱ्यावर लादली जात आहे, असे भासवणे म्हणजे भारताच्या मूलगामी संकल्पनेशी गद्दारीच ठरते.

हिंदी शिकल्यामुळे मराठी अस्मिता नष्ट होत नाही, किंवा केरळमध्ये हिंदी बोलल्याने मल्याळी अभिमान कमी होत नाही. भाषा म्हणजे संधी आहे, मर्यादा नाही. भाषांमध्ये कोणतीही स्पर्धा नसते. एखादी नवी भाषा शिकणे म्हणजे आधीच्या भाषेचा नाश नव्हे, तर ज्ञानात भरच असते.

**इंग्रजीविषयी प्रेम, आणि हिंदीविषयी तिरस्कार?**

या सगळ्या विरोधाच्या पाठीमागे आणखी एक गोष्ट दिसून येते. ती म्हणजे इंग्रजी भाषेचा सहज स्वीकार आणि हिंदीचा विरोध. प्रादेशिक पक्ष ज्या राज्यांत सत्तेवर आहेत, तिथे इंग्रजी माध्यमातून शिक्षण वाढत आहे, सरकारी संकेतस्थळे इंग्रजीत आहेत, न्यायालयीन व्यवहार इंग्रजीत चालतात, पण या सगळ्यावर विरोध होत नाही. इंग्रजीचे प्रबळ वर्चस्व या नेत्यांना चालते, पण हिंदीविषयी मात्र तिरस्कार व्यक्त केला जातो. हे राजकीय दुटप्पीपणच नव्हे का?

**हिंदीचे वास्तवात स्थान काय?**

हिंदी कोणावरही लादली जात नाही, हे ठामपणे सांगणे गरजेचे आहे. काही मुद्दे यासाठी महत्त्वाचे: संविधानात कोणतीही दुरुस्ती हिंदी अनिवार्य करणारी झाली नाही. केंद्र सरकारकडून राज्यांना हिंदी अनिवार्य करण्याचा आदेश आलेला नाही. शिक्षण धोरणांतर्गत तीन भाषांचा पर्याय राज्यांवर आहे. यूपीएससीसह अनेक राष्ट्रीय परीक्षा आता प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध आहेत. हिंदीचा प्रसार हा अन्य भाषांना गिळंकृत करण्यासाठी नाही, तर त्यांच्यासोबत समांतर चालण्यासाठी आहे.

**रोजगार आणि राष्ट्रीय एकात्मतेचा मुद्दा**

आजच्या काळात युवकांसाठी भाषिक कौशल्य हे स्पर्धात्मक फायदा आहे. केवळ मातृभाषेपुरते मर्यादित राहून चालत नाही. बिहारचा अधिकारी महाराष्ट्रात जाईल, केरळची नर्स गुजरातमध्ये नोकरी करेल, तमिळनाडूचा इंजिनिअर दिल्लीमध्ये काम करेल. अशा देशव्यापी हालचालीसाठी हिंदीचा उपयोग होतो.

हिंदीचा वापर केल्याने संवाद सुलभ होतो, रोजगार संधी वाढतात, आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट होते. मग यामध्ये धोका कुठे आहे?

हिंदी लादण्याचा आरोप करताना, सरकार प्रत्यक्षात काय करत आहे, याकडे दुर्लक्ष केले जाते. वास्तविक पाहता सरकार मातृभाषेत प्राथमिक शिक्षणाचे प्रोत्साहन. वैद्यकीय, अभियांत्रिकी व तांत्रिक पुस्तके प्रादेशिक भाषांत उपलब्ध करून देणे. सरकारी सेवा व ई-प्लॅटफॉर्म बहुभाषिक बनवले जात आहेत. म्हणूनच 'एक भारत श्रेष्ठ भारत'सारख्या उपक्रमांद्वारे राज्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण होत असते हे विसरता येत नाही. म्हणूनच ही हिंदी भाषा 'लादणे' नाही, तर 'सहअस्तित्वाचे' प्रतीक आहे.

**खरे अपयशी कोण?**

प्रादेशिक भाषा दुर्बळ होण्यामागे हिंदी नाही, तर त्या राज्यांतील सरकारच कारणीभूत आहेत. त्यांनी शिक्षण व्यवस्थेला निधी कमी दिला, प्रादेशिक भाषांच्या संशोधनासाठी आवश्यक गुंतवणूक केली नाही, विद्यापीठांची दर्जा घसरू दिला. भाषेच्या नावावर ते फक्त घोषणा करतात, पण प्रत्यक्ष कृती करत नाहीत.

हिंदी शिकणे म्हणजे मराठी अस्मिता गमावणे हे जे विधान सतत ऐकवले जाते, ते धोकादायक आहे. भारताची संस्कृती ही संवादात्मक होती. भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीतून घडलेली. या समन्वयशीलतेला दुर्लक्षित करून 'एक भाषा, एक अस्मिता' असा चुकीचा प्रचार करणे म्हणजे आपल्या संस्कृतीला दुजोरा न देणे. म्हणूनच आपल्याला हवी आहे ती भाषिक समज, राजकीय परिपक्वता. कारण सध्या आपआपला देश एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. अशावेळी 'हिंदीचा भूत' उभा करून जनतेच्या भावनांशी खेळणे, हे अनैतिक आणि स्वार्थी राजकारण ठरते. कोणत्याही भाषेला दुय्यम न ठरवता, सर्व भाषांना समजून घेऊन, देशातील युवकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणारी व्यापक दृष्टिकोनाची गरज आहे.

**भाषेच्या माध्यमातून एकात्मता**

युवकांनीही हेच समजून घेतले पाहिजे की अनेक भाषा शिकणे म्हणजे आपली संस्कृती गमावणे नाही, ती समृद्ध करणे आहे. आपल्या देशाचे सौंदर्य एका भाषेत नाही, तर अनेक भाषांतील सामंजस्यात आहे. तमिळमध्ये विचार करणे, हिंदीत संवाद साधणे, इंग्रजीत लिहिणे आणि मराठीत स्वप्न पाहणे, हेच खरे भारतीयत्व आहे. कारण हिंदी ही भाषा आपली शत्रू नाही. राजकीय सत्तेसाठी भाषेचा वापर करून प्रादेशिकतेचा बुरखा घालणे हेच खरे धोका आहे.

आपण आपल्या मुलांना सर्व भाषा शिकू देऊया. त्यांना भारतात कुठेही काम करता येईल अशी स्वप्ने बघू देऊया. कारण अखेरीस, एकात्मतेची भाषा ही समजूतदारपणाची असते, एकसंधतेची नाही.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड

# दिसायला नको,

असायला हवे,
जगणे गुणवत्तेचे
मिश्रण, व्हायला हवे.

दाखवायला नको,
करायला हवे,
प्रेम जगण्यातले,
वाढायला हवे.

वाचायला नको,
अनुभवायला हवे,
संघर्ष जगण्यातील,
स्वीकारायला हवे.

बोलणे नको,
कार्य व्हायला हवे,
जगणे कृतीमय
व्हायला हवे.

स्वप्न नको,
वास्तव हवे,
यश कल्पनेतले,
सत्यात उतरायला हवे.

**-प्रा. अमित शिंदे.**
नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

## थोडक्यात...

### डॉ.भूषण जोरगुलवार यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी राज्यशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक व लेखक डॉ.भूषण जोरगुलवार यांचे 'साहित्यिक सावरकर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

डॉ.भूषण जोरगुलवार यांचे राज्यशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण पीपल्स कॉलेजमधे झाले. कै. डॉ. ना. य. डोळे यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद विद्यापीठातून त्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली. अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून त्यांनी ३५ वर्षे सेवा केली.या काळात राज्यशास्त्रावर त्यांनी लिहिलेली १३ पुस्तके प्रकाशित झाली.त्याच बरोबर 'सम कालीन भारतीय राजकारण', 'राष्ट्रभक्त डॉ.आंबेडकर' व 'स्मृतिसाद' (आत्मकथन) ही तीन स्वतंत्र पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत.

पीपल्स कॉलेज परिसरातील स्वामी रामानंद तीर्थ स्मारक व संशोधन केंद्रात सायं. ६ वाजता होणाऱ्या या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### काही रेल्वे गाड्यांना अतिरिक्त डब्ब्यांची वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेने सामान्य श्रेणीतील प्रवाशांच्या सोयीसाठी नांदेड–मनमाड, पूर्णा– आदिलाबाद, आदिलाबाद– परळी, परळी– अकोला, पूर्णा– अकोला, पूर्णा– परळी, परळी– पूर्णा या पेसेंजर आदी गाड्यांना कायमस्वरूपी जनरल श्रेणीचे ३ अतिरिक्त डब्ब्यांची वाढ करण्यात आली आहे. या वाढलेल्या डब्ब्यांमुळे प्रवाशांना याचा फायदा होणार आहे.

# अवैध वाळू उपसा व शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कुंडलवाडी पोलिसांची कारवाई

## पोलिसांच्या पथकावरच ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न




**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** खंडगाव ते नागणी रोडवर अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध व शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कुंडलवाडी पोलिसांनी कारवाई करत मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई करत असताना पोलिसांच्या पथकावरच ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

महाराष्ट्र व तेलंगणा सीमेवरील मांजरा नदीपात्रातून वाळूची ट्रॅक्टरद्वारे नागणीकडे चोरटी वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून दि. ८ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजता कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, हवालदार सुनील दस्तके, रघुवीरसिंह चौहान, माधव पाटील, होमगार्ड येप्पुरवार, रामपुरे, जाधव मुजीव शेख, एडके यांच्या पथकांनी नागणी शिवारातील नागणी ते खंडगाव जाणाऱ्या मांजरा नदीच्या पुलाजवळ कारवाई करण्यासाठी थांबले. यावेळी मांजरा नदीपात्रातून नागणीकडे एक ट्रॅक्टर वाळूने भरलेला व सोबतच मोटारसायकलसुद्धा येत असल्याचे दिसून आले. पोलिसांच्या पथकाने ट्रॅक्टरचालकास ट्रॅक्टर थांबवण्याचा इशारा केला पण मोटारसायकलस्वाराने ट्रॅक्टरचालकास पोलीस आले आहेत. पोलिसांच्या अंगावर ट्रॅक्टर घाल, असे सांगताच चालकाने पोलिसांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा. यात स्वतः चा जीव वाचवण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे व इतर कर्मचाऱ्यांनी बाजूला उड्या मारल्या. यावेळी सपोनी शिंदे यांची सर्व्हिस रिव्हॉल्व्हर दगडावर आपटून फुटली व ते किरकोळ जखमी झाले. अंधाराचा फायदा घेत मोटारसायकलस्वार व ट्रॅक्टरचालक ट्रॅक्टर घेऊन पळून गेले. सकाळी ७ वाजता पोलिसांकडून शोधमोहीम हाती घेऊन एका शेतातून ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपी अंकुश मारुती गादगे (रा. नागणी), ट्रॅक्टरचालक विकास मारुती गादगे (रा. नागणी) व ट्रॅक्टर मालक अशा तीन जणांविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आणि ३ लाखाचा ट्रॅक्टर व ७ हजार ५०० रुपयांची दीड ब्रास वाळू व ६० हजार रुपयांची मोटारसायकल असा एकूण ३ लाख ६७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर करत आहेत. तिन्ही आरोपी पोलिसांचा हाती लागले नाही फरार आहेत.

# कुरेशी समाजाचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील शेतकरी, खरेदी विक्री करणारे व्यापारी आणि कुरेशी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द कायदेशीर संरक्षण, स्पष्ट शासकीय नियमावली, कुरेशी समाजाला शासकीय स्लॉटर हाऊस, व्यावसायिक हक्काच्या पुर्ततेची मागणी करीत कुरेशी समाजाने शनिवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. धरणे आंदोलन नांदेडसह राज्यभर जिल्ह्याच्या ठिकाणी झालेले आहे. या आंदोलनात शेकडो लोक सहभागी झालेले होते.

निवेदनात म्हटले आहे की, शेतकरी व कुरेशी (खाटीक) सम ाजाचे लोक अनेक वर्षांपासून शेती व पशु उद्योगाचा व्यवसाय करतात. तोच त्यांच्या जीवनाचा स्त्रोत सुध्दा आहे. भारत हा कृषी प्रदान देश असल्यामुळे कृषी व पशु पालन या व्यवसायावर अवलंबून आहे. शेतकरी आणि कुरेशी समाज या व्यवसाया मध्ये पिढ्यानपिढ्या काम करत आहेत. ज्यामध्ये जनावरांच्या दुधाचा व्यवसाय, भाकड जनावरांच्या मास विक्रीचा व्यवसाय सुध्दा आहे.

१९७६ मध्ये सुध्दा कायदा अस्तित्वात आल्यानंतर गो हत्या व मासाचा धंदा बंद करण्यात आला होता. पण बैल नर प्रजातीचा मास विक्रीचा धंदा सुरू होता. २०१५ मध्ये गोवंश हत्या बंदी कायदा आला आणि बैल नरप्रजातीचे मांस विक्री सुध्दा बंद झाली. पण त्यानंतर आमच्यावर अन्याय होत आहे. गोरक्षकांच्या नावावर समाजकंटकांकडून त्रास होत आहे. बऱ्याच जागी मॉबलिंचिंग होत आहे. गोरक्षक नावावर शेतकरी व व्यापाऱ्यांच्या गाड्या आडवल्या जातात, खंडणीची मागणी होते. नाही तर गुन्हे दाखल केले जातात. गौरक्षकांनी पोलीसांमार्फत जप्त केलेली गौरक्षणातील जनावरांची उच्चस्तरीय चौकशी व्हावी. सन २०१५ चा गौवंश हत्या बंदी कायदा दुरुस्त करावा. डॉक्टरांकडून वैद्यकीय प्रमाणपत्र त्वरीत मिळण्यासाठी सोय करावी, अशा अनेक मागण्या आंदोलकांच्यावतीने करण्यात आल्या.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष मोहम्मद अजीरम कुरेशी, जिल्हाध्यक्ष अब्दुल अजिज कुरेशी, शहराध्यक्ष मोहम्मद खलील कुरेशी, महासचिव मोहम्मद रफीक कुरेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. १२ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू होते. या आंदोलनात शेकडो लोक सहभागी झाले होते. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून वजिराबादचे पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम, एपीआय उमाकांत पुणे, राजू वटाणे आणि नौशाद पठाण यांच्यासह पोलीस अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.

## गुणवंत मिसलवाड यांना आदिवासी कोळी महादेव समाज भूषण पुरस्कार प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात गुणवंत मिसलवाड यांना आदिवासी कोळी महादेव समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जागतिक आदिवासी दिनाच्या औचित्याने दि.९ ऑगस्ट २०२५ रोजी हॉटेल राजयोग पॅलेस नमस्कार चौक, नांदेड येथे जिल्ह्यातील आदिवासी कोळी महादेव जमातींच्या गुणवंत विद्यार्थी (शैक्षणिक), नवनियुक्त कर्मचारी व आदर्शयुक्त समाज भूषण पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यामध्ये शैक्षणिक विद्यार्थी–विद्यार्थीनी ७०, नवनियुक्त कर्मचारी २०, समाजभूषण पुरस्कार्थी ५, एकुण पुरस्कारर्थी ९५ जणांचा यावेळी गौरव सन्मान करण्यात आला. यापैकीच एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त गुणवंत एच.मिसलवाड यांना त्यांच्या कार्याबद्दल आदिवासी कोळी महादेव समाज भूषण पुरस्कार समाजाचे ज्येष्ठ नेते यादवराव तुडमे यांच्या हस्ते देण्यात आला.

## अर्धापूर पोलीस ठाण्यात रक्षाबंधनानिमित्त महिला पोलीस कर्मचाऱ्यांना साड्या भेट



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी पहिल्यांदाच पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आली. यावेळी त्यांच्यावतीने महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी साड्या भेटवस्तू म्हणून देण्यात आल्या.

रक्षाबंधन म्हटले की बहीण–भावाला राखी बांधण्याची परंपरा असते. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी महिला पोलीस कर्मचारी यांच्यासोबत राखी पौर्णिमा साजरी करून साडीचोळी व मिठाई भेट देऊन आगळे वेगळे रक्षाबंधन साजरे केले.

यावेळी सहायक पोलीस उपनिरीक्षक वानिता दूधमल, महिला पोलीस अंमलदार सुवर्णा निकम, विद्यावती कापसे, इंदू गवळी, मनिषा डुकरे, जयश्री पांचाळ, अश्विनी गोडबोले, अनिता भालेराव, प्रतिभा तरटे, राजाबाई येमेकर, ठाणे अंमलदार प्रदिप जमदाडे, जमादार एस.के.ढवळे, आर.एस.नरवाडे, महेंद्र डांगे, मिर्झा अखिल बेग, सुभाष मुंगल, विजय आडे, वानोळे यांच्यासह पोलीस अधिकारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थीत मोठ्या उत्साहात रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

## नांदेड पोलीस दलातील एएसआय आणेराव टांजानिया देशातील किलीमांजरो शिखर सर करण्यासाठी रवाना






**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा पोलीस दलात उस्माननगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या सहायक पोलीस उपनिरिक्षक लोपमुद्रा अनेराव या टांझानिया देशातील किलीमांजारो हे शिखर सर करण्यासाठी रवाना झाल्या आहेत. त्यांना पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधिक्षक अश्विनी जगताप, उस्माननगरचे सहाय्यक पोलीस निरिक्षक संजय निलपत्रेवार आणि आपल्या सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

लोपमुद्रा अनेराव ह्या यापुर्वी अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होऊन सुवर्णपदक, रौप्यपदक मिळविले आहे. आता त्या आफ्रिका खंडातील सर्वात उंच असलेल्या किलीमांजरो उंची ५८९५ मिटर आहे आणि समुद्र सपाटीपासून १९, ३४१ फूट उंचीवरील पर्वताला गवसणी घालण्यासाठी रवाना झाल्या आहेत.

## अंध विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात



**नवीन नांदेड़ (प्रतिनिधी)–** निवासी अंध विद्यालय वसरणी येथे रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील अंध मुलींनी अंध मुलांना राख्या बांधल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायत विभाग संघटक मराठवाडा बालाजीराव लांडगे हे होते. तर प्रमुख अतिथी ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्याचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ.सायना मटमवार, स्काऊट गाईडचे जिल्हा आयुक्त सौ. भगिरथीताई बच्चेवार, जिल्हा स्काऊट गाईडचे सहायक आयुक्त रमेश फुलारी, स्काऊट गाईड नांदेडचे जिल्हा संघटन आयुक्त माधुरीताई दवणे, शिवाजी हायस्कूल सिडकोचे स्काऊट गाईडचे जाधव यांची उपस्थिती होती.

## स्वाधार योजनेंतर्गत दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन उपस्थिती आवश्यक

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षातील विद्यार्थ्यांचे अर्ज महाआयटी या ऑनलाईन प्रणालीद्वारे छाननी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज पात्र झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना दुसरा हप्ता देण्यासाठी त्यांची महाविद्यालयीन उपस्थिती ७५ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज पात्र झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी त्यांची महाविद्यालयीन उपस्थिती ('बी' स्टेटमेंट) महाआयटी या ऑनलाईन प्रणालीवर समाविष्ट करावी. त्यानंतर त्याची मूळ प्रत समाज कल्याण कार्यालयातील स्वाधार विभागात लवकर जमा करावी. जेणे करून पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील जे विद्यार्थी शासकीय प्रवेशास पात्र असुन प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना मट्रीकोत्तर शिक्षण घेता भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी १३ जून २०१८ व २६ डिसेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही राबविण्यात येत आहे.

## श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी कावड यात्रेला शिवभक्तांचा अभूतपूर्व प्रतिसाद



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर हर हर महादेवच्या जयघोषात भक्तिमय उत्साहात काढण्यात आलेल्या नृसिंह मंदिर श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी या कावड यात्रेला नरसी व पंचक्रोशीतील शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गेल्या तीन वर्षांपासून कावड यात्रेच्या महाप्रसादाचे मानकरी असलेले माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी यावर्षी देखील सिद्धेश्वर महादेव मंदिर येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. यावेळी तीन हजारांपेक्षा अधिक भाविकांनी या महाप्रसाद सोहळ्यात उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतला.

नरसी नगरीचे धार्मिक वैभव उंचावणाऱ्या श्रीक्षेत्र राहेर ते नरसी कावड यात्रा सोहळ्यात प्रतिवर्षी शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग वाढत असून, यावर्षी महिलांची उपस्थिती लक्षणीय ठरली. बुधवारी भल्या पहाटे श्रीक्षेत्र राहेर येथील ऐतिहासिक हेमाडपंथी नृसिंह मंदिर व पवित्र गोदापात्रात माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे व इतर शिवभक्तांच्या सानिध्यात महाआरती करून वेदशास्त्र संपन्न संदीप महाराज जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोदामातेची मनोभावे आराधना करण्यात आली.

शेकडो शिवभक्त कलशात पवित्र गोदावरीचे जल भरलेली कावड खांद्यावर घेवून बम बम भोलेच्या गजरात नरसीच्या दिशेने पायी मार्गस्थ झाले. या दरम्यान ठिकठिकाणी कावड यात्रेतील शिवभक्तांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या पायी यात्रेत शिवभक्तांच्या सुविधेसाठी योगदान देणाऱ्या भक्तांचा श्रावण पाटील भिलवंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी वे.शा.स. संदीप महाराज जोशी यांचे भक्तिमय प्रबोधन देखील पार पडले. देवाधिदेव महादेव यांची गगनचुंबी प्रतिमा कावड यात्रेचे मोठे आकर्षण ठरली.

कावड यात्रेत सहभागी झालेल्या असंख्य महिलांसह सर्व शिवभक्तांनी यात्रा नरसीत पोहचल्यानंतर येथील सुप्रसिद्ध सिद्धेश्वर मंदिरातील महादेवाला गंगाजल अर्पण करून जलाभिषेक केला. सलग तीन वर्षांपासून महाप्रसादाचे मानकरी असलेल्या माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी यंदा देखील हजारो शिवभक्तांच्या प्रसादाची व्यवस्था केली.

कावड यात्रेतील शिवभक्तांसह नायगाव तालुक्यातील तीन हजारांपेक्षा अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी श्रावण पाटील भिलवंडे यांनी सर्व भाविकांचे अगत्यपूर्ण आदरातिथ्य करून आभार मानले.

संपूर्ण कावड यात्रेत शेकडो शिवभक्तांसह श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसीपर्यंत श्रावण पाटील भिलवंडे यांनी पायी मार्गक्रमण करीत सहभाग घेतला.

प्रचंड भक्तीभावाने व अपूर्व उत्साहात संपन्न झालेल्या या भक्तिमय कावड यात्रेत वे.शा.स. संदीप महाराज जोशी, रामकिसन महाराज राजलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे, राजेश भिलवंडे, साईनाथ आक्कमवाड, बालाजी चिंतावार, पत्रकार गोविंद नरसीकर, सुभाष पेरकेवार, कैलास तेलंग, श्रीनिवास आक्कमवाड, मारोतराव वडगावे, अनिल श्रीराम वार, राम खनपट्टे, विनोद भिलवंडे, मारोती बुक्के, नंदेश्वर कोरे, संदीप भिलवंडे, गणेश मेहता, अंकुश खनपटे, रमेश वासरे, संतोष जुक्कलकर, जयदीप सोनकांबळे, गोविंद मानेमोड, मारोती वडजे, चंदू कोकणे, सोमेश शेटकर आदींसह असंख्य भाविक सहभागी झाले होते. नरसी येथील सर्व शिवभक्तांनी कावड यात्रेच्या यशस्वी आयोजनात परिश्रम घेतले. पुढील वर्षीही भव्य कावड यात्रा काढण्याचा संकल्प करतांना महाप्रसादासह नरसी येथे विविध धार्मिक व भक्तिमय उपक्रम आयोजित करण्याचा मनोदय महाप्रसादाचे मानकरी असलेले माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी व्यक्त केला.

## गोदावरी मनार पब्लिक स्कूलमध्ये जागतिक आदिवासी दिवस व रक्षाबंधन उत्साहात



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** येथील गोदावरी मनार पब्लिक स्कूल व ज्यु.कॉलेजमध्ये दि. ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस व रक्षाबंधन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर.के.सूर्यवंशी तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक समितीचे अध्यक्ष आनंदराव माने व डॉ. हरिदास कोकाटे हे उपस्थित होते. व्यासपीठावर, एस.डी. जाधव, सौ. दोमाटे, .सय्यद एल.बी., वाघमारे, सौ. धनवे यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

आदिवासी दिनानिमित्त रामतीर्थ व शंकरनगर गावांमध्ये शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पारंपरिक आदिवासींच्या वेशभूषेत अनेक विद्यार्थ्यांकडून वेशभूषा, केशभूषा विविध महापुरुषांचे देखावे सादर करून सामाजिक संदेश देण्यात आला. तसेच निबंध स्पर्धा, वक्तृत्व, गायन, चित्रकला, एकांकिका, नृत्य स्पर्धा भाषण यासह सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडला. यासह दि. ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सण असल्याने शाळेच्या प्रांगणात मुलींकडून मुलांना राख्या बांधत भाऊ–बहिणीच्या अतूट प्रेम आणि आपुलकीचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन महेश गेडाम, तर आभार उर्मिला तोडे यांनी मानले.

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नारायण अंबुरे

**नांदेड (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नारायण अंबुरे यांची निवड करण्यात आली आहे.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.छगनराव भुजबळ, माजी खा.समीर भुजबळ, आ.पंकज भाऊ भुजबळ, बापूसाहेब भुजबळ यांच्यावतीने ही निवड करण्यात आली आहे.

नारायण अंबुरे यांच्या निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते रमेश तालीमकर, व्यंकटराव इंगळे, किशनराव धुमाळ, साहेबराव डाकोरे, दत्ता दुंधबे यांच्याह व मित्र परिवार व ओबीसी बांधवांकडून अभिनंदन केले जात आहे.

# चंदेरी

## बाळासाहेब ठाकरे यांचा नातू गाजवणार बॉलीवूड

बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे लवकरच बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. त्याच्या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर समोर आले आहे. यात तो महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. लोकप्रिय दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्या आगामी चित्रपटात तो दिसणार आहे. 'नीशांची' असे या चित्रपटाचे नाव आहे.

चित्रपटाची निर्मिती अजय राय व रंजन सिंह यांनी केली आहे. हा चित्रपट येत्या १९ सप्टेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाची चर्चा होती. 'नीशांची' या चित्रपटात ऐश्वर्य ठाकरेसह वेदिका पिंटो, मोनिका पानवार, मोहम्मद झिशान आयुब आणि कुमुद मिश्रा हे कलाकार झळकणार आहेत. या चित्रपटाचे पहिले पोस्टर पाहिल्यानंतर सोशल मीडियावर प्रेक्षकांनी याची तुलना अनुराग कश्यपच्या 'गँग्स ऑफ वासेपूर', 'गुलाल' आणि 'मुक्केबाझ' यांसारख्या चित्रपटांशी केली आहे. 'नीशांची' चित्रपटाबद्दल अनुराग कश्यपने सांगितलेलं की, आम्ही २०१६ मध्ये या चित्रपटाची कथा लिहिली होती, तेव्हापासून मी यावर चित्रपट बनवण्याच्या विचारात होतो. नीशांची हा चित्रपट प्रेम, क्राईम, शिक्षा, छळ यावर आधारित आहे.

## स्मृती इराणी सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री

### दीपिका पादुकोणलाही टाकलं मागे

**एकेकाळी 'क्योंकि सास भी कभी बहू थी' ही मालिका प्रचंड गाजली होती. यातील सर्वच कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे आणि ते अजूनही कायम आहे. अशातच आता या हिट मालिकेचा दुसरा भागही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या मालिकेनिमित्त 'तुलसी' फेम अभिनेत्री स्मृती इराणी यांनी छोट्या पडद्यावर दमदार पुनरागमन केलं आहे.**



गेल्या काही वर्षांत स्मृती इराणी राजकारणात सक्रिय होत्या. त्यामुळे त्यांनी कलाक्षेत्रातून काही काळ ब्रेक घेतला होता. मात्र, सध्या स्मृती इराणी तुलसी विराणीच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. त्यांच्या 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' या मालिकेने अवघ्या काही दिवसांतच रेकॉर्ड मोडले आहेत, त्याचबरोबर स्मृती इराणी यांनीसुद्धा कमाईबाबत मोठा विक्रम केला आहे. त्या टीव्ही इंडस्ट्रीतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री ठरल्या आहेत. स्मृती इराणी प्रत्येक एपिसोडसाठी तब्बल १४ लाख रुपये घेत आहेत. यामुळे त्यांनी 'अनुपमा' मालिकेच्या प्रत्येक एपिसोडसाठी ३ लाख रुपये घेणाऱ्या रुपाली गांगुली, तसंच दोन लाखांपर्यंत मानधन घेणाऱ्या हिना खान यांनाही मागे टाकलं आहे. याबाबत स्मृती इराणी म्हणाल्या, जो व्यक्ती सातत्याने चांगली कामगिरी करतो, ज्यामुळे त्या मालिकेची टीआरपी वाढते, त्याला योग्य मोबदला मिळायलाच हवा. माझं मानधन हे अशा प्रकारच्या व्यावसायिक दृष्टीकोनाचं उदाहरण आहे आणि हे सगळं सहजासहजी मिळालेलं नाही, यामागे खूप मेहनत आहे. 'क्योंकि सास भी कभी बहू थी २'चे १५० एपिसोड प्रसारित होणार आहेत. त्यामुळे या मालिकेमधून स्मृती इराणी तब्बल २१ कोटी रुपये कमावणार आहेत. यामुळे मानधनाबाबत त्यांनी बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोणलाही मागे टाकलं आहे. शाहरुख खानबरोबरच्या 'पठान' चित्रपटासाठी दीपिकाला एकूण १५ कोटी रुपये मानधन मिळालं होतं. नव्या भागामध्ये स्मृती इराणी आणि अमर उपाध्याय मुख्य भूमिकेत असून, त्यांच्यासह हितेन तेजवानी, गौरी प्रधान, रोहित सुचांती, शगुन शर्मा, अमन गांधी, तनिषा मेहता, अंकित भाटिया आणि प्राची सिंग यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. सध्या मालिकेला प्रेक्षक चांगलाच प्रतिसाद देत आहेत. जुन्या पिढीसह आजच्या पिढीमधील प्रेक्षकांनासुद्धा ही मालिका आवडत आहे.

## अजय-काजोलचा गोव्यात आलिशान व्हिला, एका रात्रीचं भाडं ७५ हजार रुपये

**चित्रपटांमध्ये अभिनय करण्याव्यतिरिक्त, काही कलाकार व्यवसाय करण्यासाठीदेखील प्रसिद्ध आहेत. त्यांचे खूप मोठे व्यवसाय आहेत. बॉलीवूडचे कपल अजय देवगण आणि काजोल हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय चेहऱ्यांपैकी एक आहेत. हे जोडपे मुंबईत शिवशक्ती नावाच्या त्यांच्या बंगल्यात राहतात. ज्याची किंमत ६० कोटी रुपये आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या या जोडप्याने बरीच संपत्ती जमवली आहे.**

या जोडप्याचे लंडनमध्येदेखील एक आलिशान घर आहे. उत्तर गोव्यात त्यांचा एक आलिशान व्हिला आहे, ज्याला त्यांनी व्हिला एटरना असे नाव दिले आहे. काजोल आणि अजय गोव्यात त्यांच्या सुट्टीत जातात. या जोडप्याने ही मालमत्ता गेस्टसाठीदेखील खुली केली आहे. व्हिला एटरना अतिशय आलिशान पद्धतीने सजवलेला आहे. हा व्हिला उत्तर गोव्यातील मोइरा गावाजवळ आहे. हा व्हिला पोर्तुगीज स्टाईलमध्ये बांधला गेला आहे आणि त्यात सर्व मॉडर्न सुविधा आहेत. तुम्ही व्हिलामध्ये प्रवेश करताच, तुमचे स्वागत प्रथम एका मोठ्या स्विमिंग पूलद्वारे केले जाते. हे घर स्विमिंग पूलभोवती बांधलेले आहे. व्हिला हिरव्यागार झाडांनी वेढलेला आहे आणि रहिवाशांना एकांतदेखील मिळतो. स्विमिंग पूलजवळ एक लॉन आहे जो हिरवळीने भरलेला आहे, त्यात एक बागदेखील आहे. लॉनच्या शेजारी, घरामध्ये शंभर वर्षे जुनी विहीरदेखील आहे. व्हिलामध्ये पाच बेडरूम आहेत आणि प्रत्येक खोली वेगळ्या स्टाईलमध्ये बांधलेली आहे. सर्व खोल्या आरामदायी आणि सुंदर आहेत आणि लाकडी बेड आणि सोफे आहेत. प्रत्येक खोलीतून हिरव्यागार लॉन आणि स्विमिंग पूलचे सुंदर दृश्य दिसते. या व्हिलामध्ये एक मोठा डायनिंग एरियादेखील आहे. हा व्हिला जितका मोठा दिसतो तितकाच तो सुंदर आणि सुसज्ज आहे. हा व्हिला बाहेरून जितका सुंदर दिसतो तितकाच तो आतूनही सुंदर आहे. यात एक मोठा वॉटर वॉल फाउंटन आहे, जो समुद्रकिनाऱ्यासारखा अनुभव देतो आणि पाण्याचा आवाज त्याला शांत वातावरण देतो. तर एटरनाचे एका रात्रीचे भाडे सुमारे ७५,००० हजार रुपये आहे.





## आमिरने ४ आलिशान फ्लॅट्स दिले भाड्याने

**बॉलीवूड अभिनेता आमिर खान कुठल्या न कुठल्या कारणाने प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरत असतो. अशातच आता तो सध्या चर्चेत आलाय ते त्याने भाड्याने दिलेल्या त्याच्या फ्लॅट्समुळे. अभिनेत्याचे मुंबईत अनेक फ्लॅट्स असून, त्यासाठी त्याने आकारलेल्या भाड्याची रक्कमही बरीच मोठी आहे.**

आमिर खानचे मुंबईतील वांद्रे परिसरात विरगो सोसायटीमध्ये अनेक फ्लॅट्स आहेत. सध्या त्या इमारतीचे काम सुरू असल्याने अभिनेता दुसरीकडे राहत आहे. तो राहत असलेल्या इमारतीचे नूतनीकरण करून तिथे आलिशान फ्लॅट्स बांधण्याचं डेव्हलपरचं नियोजन असल्याचे म्हटले जात आहे. अहवालानुसार या इमारतीत आमिर खानचे तब्बल १२ फ्लॅट्स आहेत. आमिर खान सध्या राहतो त्याच परिसरात शाहरुख खानचेही घर आहे. त्याच्या मन्नत या आलिशान बंगल्याचे काम सुरू असल्याने तो सध्या वांद्रे येथील पूजा कासा इमारतीत राहत आहे. आमिर खानने वांद्रे येथील त्याचे ४ आलिशान अपार्टमेंट्स भाड्याने दिले असून, दर महिन्याला तो त्या भाड्यांतून २४.५ लाख इतकी रक्कम मिळवत आहे. त्याने ४५ महिन्यांचा हा करार केला आहे. २०२५ ते २०३० अशा कालावधीत त्याचे अपार्टमेंट्स त्याने भाड्याने दिले आहेत. या करारात १.४६ कोटींची सुरक्षा ठेवसुद्धा समाविष्ट आहे; तर स्टँप ड्युटीसाठी चार लाख व रजिस्ट्रेशनसाठी २,००० अशी रक्कम आहे. त्याशिवाय या अपार्टमेंट्सचे भाडे दरवर्षी पाच टक्क्यांनी वाढणार असल्याचंही ॲग्रीमेंटमध्ये नमूद करण्यात आले आहे. माध्यमांच्या माहितीनुसार काही दिवसांपूर्वी शाहरुख खाननेही वांद्रे येथील पूजा कासा इमारतीत दोन ड्युप्लेक्स अपार्टमेंट भाड्याने घेतले होते. ज्याचे वर्षाचे एकूण भाडे २.९ कोटी इतके आहे. पूजा कासा येथील हे अपार्टमेंट अभिनेता जॅकी भगनानी, त्याची बहीण दीपशिखा देशमुख व वडील निर्माते वाशू भगनानी यांच्या नावे आहेत.

## ५०० रुपये घेऊन मुंबईला आलेला अभिनेता २४ कोटींचा मालक

**सुनील ग्रोव्हर याने नुकताच ४८ वा वाढदिवस साजरा केला. कधी डॉ. मशहूर गुलाटी, कधी गुत्थी, तर कधी रिंकू भाभी या भूमिकेत लोकांना हसवणारा सुनील प्रत्येक भूमिकेत इतक्या चांगल्या प्रकारे उतरतो की, पडद्यावर स्त्रीच्या भूमिकेत दिसणारा हा अभिनेता प्रत्यक्षात पुरुष आहे याची कल्पनाही तुम्ही करू शकत नाही. सुनील ग्रोव्हरने विनोदी अभिनयातून खूप मोठे यश मिळवले आहे; परंतु त्या यशामागील इंडस्ट्रीतील त्याचा प्रवास सोपा नव्हता. प्रेक्षकांमध्ये आपली ओळख निर्माण करण्यापूर्वी, त्याला अनेक वेळा नकाराचा सामना करावा लागला.**



हरियाणाच्या सिरसा जिल्ह्यातील मंडी डबवाली या छोट्याशा गावात राहणारा सुनील ग्रोव्हर प्रत्येक अभिनेत्याप्रमाणे मोठी स्वप्ने घेऊन मुंबईत आला होता. तो अमिताभ बच्चन आणि शाहरुख खान यांचे चित्रपट पाहत मोठा झाला आणि येथूनच त्याच्यात अभिनयाची आवड निर्माण झाली. जेव्हा तो मुंबईत आला तेव्हा त्याच्या खिशात फक्त ५०० रुपये होते. त्याला एक वर्ष काम मिळाले नाही आणि त्यामुळे त्याची सर्व बचत या एक वर्षात खर्च झाली. अनेक नकारांना तोंड दिल्यानंतर त्याला एका शोची ऑफर मिळाली. त्याने त्यात तीन दिवस काम केले; परंतु तीन दिवसांनंतर त्याला अचानक एका रात्रीत काढून टाकण्यात आले. शोमधून काढून टाकण्याचे कोणतेही कारण देण्यात आले नाही. नंतर हळूहळू त्याला काम मिळू लागले. पण तो महिन्याला जेमतेम ५०० रुपये कमवू शकत होता. समस्या इतकी गंभीर झाली होती की, त्याला जेवणही परवडत नव्हते. अशा परिस्थितीत कपिल शर्माचा शो सुनील ग्रोव्हरच्या कारकिर्दीला कलाटणी देणारा ठरला. कपिलच्या शोने सुनील ग्रोव्हरला रातोरात स्टार बनवले. गुत्थी आणि डॉ. मशहूर गुलाटी यांच्या भूमिकांमुळे तो घराघरात लोकप्रिय झाला. विनोदाबरोबरच सुनील ग्रोव्हरने अनेक प्रकारच्या चित्रपटांमध्ये काम केले आहे आणि विनोदी कलाकार असण्यापलीकडे त्याने गंभीर भूमिकांमध्येही स्वतःला सिद्ध केले आहे. 'गब्बर इज बॅक', 'जवान', 'भारत', 'बागी' व 'गुड बाय' मध्ये या भूमिका त्याने खूप गंभीरपणे साकारल्या. स्वतःच्या बळावर इंडस्ट्रीत नाव कमावलेला सुनील ग्रोव्हर आज कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा मालक आहे. तो कॉमेडी शोमधील एका एपिसोडसाठी २५ लाख रुपये घेतो. त्याचे मुंबईत एक आलिशान घर आहे, ज्याची किंमत सुमारे २.५ कोटी रुपये आहे. त्याच्याकडे अनेक आलिशान गाड्या आहेत. तो एका इन्स्टाग्राम पोस्टसाठी ५-१० लाख रुपये घेतो. त्याची एकूण संपत्ती सुमारे २४ कोटी रुपये आहे.

## तेजस्वी म्हणाली, मी टक्कलही करेल!

**तेजस्वी प्रकाश हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक मालिकांमध्ये मुख्य भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. हिंदीसह मराठीतही काम केलं आहे. अशातच आता तिने एका मुलाखतीत भूमिकेसाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याचं म्हटलं आहे. भूमिकेसाठी मी टक्कलही करू शकते, असे ती म्हणाली.**




जर एखाद्या भूमिकेसाठी गरज भासली तर मी टक्कलदेखील करायला तयार आहे. मी अशा गोष्टींसाठी तयार असते. इंडस्ट्रीत सगळ्यांनी प्रत्येक गोष्टीसाठी इतक्या वेगवेगळ्या पर्यायांचा शोध घेतलाय, मग ते केसांचा रंग वेगळा दाखवायचा असो, टक्कल दाखवायचं असो किंवा सोनेरी रंगाचे केस दाखवायचे असो. पण, अजूनतरी प्रत्यक्षात कोणी मला हे करायला सांगितलं नाही; पण कधी जर सांगितलं तर मी नक्कीच ते करेन, असे ती म्हणाली. तेजस्वी ही हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय चेहरा असून तिने आजवर 'स्वरागिनी', 'रिश्ते लिखेंगे हम नये', 'सिलसिले बदलते रिश्तों का', 'थपकी प्यार की', 'कसम', 'पेहरेदार पिया की', 'संस्कार', 'कर्ण संगीनी', 'ससुराल सिमर का', 'नागीन ६', 'सेलिब्रिटी मास्टर शेफ', 'खतरो कें खिलाडी', 'बिग बॉस' यांसारख्या मालिकांमध्ये व रिॲलिटी शोमध्ये काम केलं आहे. तेजस्वी प्रकाशने मराठीतही काम केलं आहे. तिने 'स्कूल कॉलेज आणि लाईफ', 'मन कस्तुरी' यांसारख्या चित्रपटांत काम केलं आहे. तिच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं तर सध्या ती अभिनेता करण कुंद्रासह रिलेशनशिपमध्ये आहे.

## दुर्दैवी चित्रपट : शूटिंगदरम्यान दोन अभिनेत्यांसह दिग्दर्शकाचा मृत्यू!

**बॉलीवूडमध्ये असे काही चित्रपट आहेत, ज्यांचा प्रवास खूप दुःखद आणि गूढतेने भरलेला आहे. आज आम्ही तुम्हाला अशा चित्रपटाबद्दल सांगणार आहोत, जो बनवण्यासाठी २३ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी लागला. या चित्रपटाबद्दल सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे तो बनवताना त्याचे दोन मुख्य कलाकार आणि दिग्दर्शक यांचे निधन झाले. त्यामुळे हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वांत दुर्दैवी चित्रपट मानला गेला.**


या चित्रपटाची कथा आणि त्याच्याशी संबंधित घटना ऐकून सर्वांनाच धक्का बसला आहे. एकीकडे चित्रपटात कलाकारांचे समर्पण दिसते; तर दुसरीकडे प्रत्येक वळणावर मृत्यूची सावली दिसते. त्याहूनही धक्कादायक म्हणजे हा चित्रपट अनेक वेळा थांबवण्यात आला आणि नंतर पुन्हा तो सुरू करण्यात आला; पण प्रत्येक वेळी काही ना काही अपघात झाला. अखेर हा चित्रपट कसातरी पूर्ण झाला आणि तो मोठ्या पडद्यावर आणण्यात आला.

या चित्रपटाचे नाव 'लव्ह अँड गॉड' होते, ज्याला काही लोक 'कैस और लैला' म्हणूनही ओळखतात. या चित्रपटाचे चित्रीकरण पहिल्यांदा १९६३ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ होते आणि प्रसिद्ध अभिनेते गुरु दत्त यांना मुख्य भूमिकेत घेण्यात आले होते. लैलाच्या भूमिकेसाठी निम्मीची निवड करण्यात आली होती. पण, १९६४ मध्ये गुरु दत्त यांचे अचानक निधन झाले आणि हा चित्रपट अपूर्ण राहिला. त्यांच्या निधनानंतर चित्रपटाचे चित्रीकरण थांबले. गुरु दत्त यांच्या निधनानंतर दिग्दर्शक के. आसिफ यांनी हा चित्रपट बंद केला. काही वर्षांनी त्यांनी चित्रपट पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला आणि संजीव कुमार यांना मुख्य भूमिकेत घेतले. त्यानंतर १९७० मध्ये चित्रपटाचे चित्रीकरण पुन्हा सुरू झाले; परंतु याच काळात चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांचेही निधन झाले. हा त्यांच्या कारकिर्दीतील पहिला आणि शेवटचा अपूर्ण चित्रपट आहे. ते त्याचा रिलीज पाहू शकले नाहीत. चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांच्या निधनानंतर चित्रपटाचे चित्रीकरण पुन्हा एकदा थांबले. चित्रपट बराच काळ अपूर्ण राहिला. त्यानंतर त्यांच्या पत्नी अख्तर आसिफ यांनी तो पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी चित्रपट निर्माते के. सी. बोकाडिया यांच्या मदतीने चित्रीकरण पूर्ण केले. चित्रपटाचे काही भाग तीन वेगवेगळ्या स्टुडिओंमध्ये चित्रित करण्यात आले. जेव्हा सर्व काही तयार झाले, तेव्हा १९८५ मध्ये संजीव कुमार यांचे निधन झाल्याची आणखी एक वाईट बातमी आली. अशा प्रकारे हा चित्रपट बनवण्यासाठी २३ वर्षे लागली. सतत होणाऱ्या अपघातांमुळे त्याला बॉलीवूडच्या दुर्दैवी चित्रपटाचा दर्जा मिळाला. पण, सर्व अडचणी आणि दुःखांनंतर हा चित्रपट अखेर २७ मे १९८६ रोजी प्रदर्शित झाला. प्रेक्षकांसाठी हा चित्रपट केवळ एक प्रेमकथा नव्हता, तर त्यामागे लपलेला संघर्ष आणि शोकांतिकाही तितकीच खोल होती. या चित्रपटात त्याच भावना दिसतात, ज्या दिग्दर्शकाला तो बनवताना दाखवायच्या होत्या.



## मानसी पारेखला निर्मात्यानं लग्नाची घातली होती भीती!

**अभिनय क्षेत्रात कलेसह सौंदर्याला, दिसण्यालाही महत्त्व असतं. अभिनेत्रींच्या बाबतीत तर बऱ्याचदा त्यांना त्यांच्या दिसण्यावरून कामं दिली जातात, असं म्हटलं जातं. लोकप्रिय अभिनेत्री मानसी पारेख हिने याबद्दलचा तिचा अनुभव सांगितला आहे. तिला लग्न केलं तर काम मिळणार नाही, असंही सांगण्यात आलं होतं. ती हिंदी व गुजराती चित्रपटात काम करते.**



मानसीने सांगितलं, की मी लग्न करणार होते तेव्हा एका निर्मात्यानं मला सांगितलं, की लग्न करू नकोस. जाड होशील. मग तुला कोणी काम देणार नाही. पण, माझं असं मत होतं की, लग्नानंतर मी जाड का होईन? कारण- आताही मी काम करीत आहे आणि गेल्या २० वर्षांपासून या इंडस्ट्रीत काम करतेय. मानसीला आठ वर्षांची एक मुलगी आहे. ती म्हणाली, की मी एक आई आहे आणि तरीही मी काम करीत आहे. त्यामुळे लोकांनी सांगितलेल्या गोष्टी योग्य आहेत की नाही मला माहीत नाही. कदाचित त्या असतीलही; पण मी मला हवं तसंच आयुष्य जगणार आहे. मी फक्त करिअर करत राहणार नाहीये. मला आयुष्यात दोन्ही गोष्टी हव्या आहेत. मानसीने गायक पार्थिव गोहिलसह लग्न केलं आहे. नवऱ्याबद्दल ती म्हणाली, की मला योग्य जोडीदार मिळाला आहे. पार्थिवसह लग्न केल्याचं मला समाधान आहे. तोसुद्धा एक कलाकार आहे. तो मला समजून घेतो. आई झाल्यानंतर माझी चित्रपटांतील कारकीर्द सुरू झाली. त्यामुळे आता असे कोणतेही नियम नाहीयेत आणि ती एक खूप चांगली गोष्ट आहे. मानसी एक अभिनेत्री व निर्माती आहे. तिनं हिंदी व गुजराती चित्रपटांत काम केलं आहे.

# एकनाथ शिंदेंचा पीए असल्याचं भासवत २० जणांना लाखोंना गंडवलं

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचा गैरवापर करून तब्बल ५५ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार जळगाव जिल्ह्यात उघडकीस आला आहे.

पाचोरा येथील हितेश रमेश संघवी आणि पत्नी अर्पिता संघवी या दाम्पत्याने हा सगळा प्रकार केला असून त्यांनी एकनाथ शिंदे यांचे 'स्वीय सहाय्यक' असल्याचा बनाव करत १८ ते २० नागरिकांना रोजगार आणि घरे देण्याचे आमिष दाखवून मोठी आर्थिक फसवणूक केल्याची माहिती समोर येत आहे.

फसवणुकीसाठी दाम्पत्याने एकनाथ शिंदे यांच्या नावाचे बनावट ओळखपत्र, लेटरपॅड आणि अपॉइंटमेंट लेटर तयार करून पीडितांना दाखवले. यात त्यांनी शासकीय नोकरी, विशेषतः रेल्वेमध्ये नोकरी, म्हाडामध्ये फ्लॅट मिळवून देण्याचे आमिष दाखवले.

या दाम्पत्याने नोव्हेंबर २०२४ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार राबवला. यात हर्षल शालिग्राम बारी या व्यक्तीकडून एकट्याकडून १३ लाख ३८ हजार रुपये, तर उर्वरित लोकांकडून मिळून ४२ लाख २२ हजार रुपये उकळले. हा संपूर्ण आर्थिक व्यवहार जळगावमधील कालिका माता मंदिर परिसरातील दूध डेअरीमध्ये पार पडल्याचे उघड झाले आहे. यानंतर बराच काळ वाट पाहूनही ना नोकरी मिळाली, ना कोणतेही आश्वासन पूर्ण झाले. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर हर्षल बारी यांनी शनिपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तत्काळ हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलिसांकडून याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांचा पुतण्या असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार श्रीकांत शिंदे तसेच मंत्री गुलाबराव पाटील हे माझ्या खूप जवळचे असून पोलीस दलात नोकरी लावून देण्याची आमिष युवतीच्या आईला वारंवार दाखवल्याचा प्रकार नाशिकमध्ये उघडकीस आला आहे. नाशिकच्या निफाड तालुक्यातील सायखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील औरंगपूर येथील स्वाती राजेंद्र चाबुकस्वार १९ वर्षीय युवतीची साडे चार लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाली आहे.

# 'आशिया कप' भारत–पाकिस्तान तीन वेळा येणार आमने सामने?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिका २–२ अशा बरोबरीत सुटली आहे. कसोटी मालिकेत चागंली कामगिरी केल्यानंतर भारत आता आशिया कप स्पर्धेत खेळणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वात भारतीय क्रिकेट टीम आशिया कपमध्ये सहभागी होईल. आशिया कप स्पर्धा ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर दरम्यान पार पडेल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबरला होणार आहे. आशिया कप स्पर्धा दुबई आणि अबू धाबीत पार पडणार आहे.

आशिया कपची पहिली मॅच ९ सप्टेंबरला अफगाणिस्तान विरुद्ध हाँककाँग यांच्यामध्ये होईल, ही मॅच अबू धाबीमध्ये होईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना दुबईतील मैदानावर १४ सप्टेंबरला होणार आहे. भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ सुपर ४ राऊंडमध्ये पोहोचल्यास २१ सप्टेंबरला दोन्ही संघ पुन्हा आमने सामने येतील. याशिवाय दोन्ही संघ फायनलमध्ये पोहोचल्यास चाहत्यांसाठी ती पर्वणी ठरु शकते. फायनल २८ सप्टेंबरला होणार आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारतानं केलेलं ऑपरेशन सिंदूर यामुळं दोन्ही देशांमधील तणाव वाढला होता. आशियाई क्रिकेट काऊन्सिलनं आशियाा कप स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं होतं, त्यानुसार स्पर्धा पार पडणार आहे. मात्र, आशिया कप स्पर्धा संयुक्त अरब अमिरातमध्ये होईल. आशिया कप स्पर्धेत ८ संघ खेळणार आहेत. आशियाई क्रिकेट काऊन्सिलचे ५ पूर्णवेळ सदस्य देश अफगाणिस्तान, बांगलादेश, भारत, पाकिस्तान, श्रीलंका या देशांशिवाय संयुक्त अरब अमिरात, ओमान आणि हाँगकाँगचा समावेश असेल.

# आयटीआय मध्ये तांत्रिक शिक्षणासोबत व्यक्तीमत्व विकासाचे २० अभ्यासक्रम १५ सप्टेंबर पासून सुरू होणार –मंत्री लोढा

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५ मध्ये मुख्यमंत्री उद्योजकता व नाविन्यता महाफंडयोजना राबविण्यात येणार आहे. विविध तंत्रशिक्षण प्राप्त ३० लाख युवक–युवतींची शासनाकडे नोंद आहे. या सर्वांना ईमेल करून त्यांची एआयद्वारे परीक्षा घेण्यात येईल. यामध्ये पाच लाख युवक–युवतींची विविध पद्धतीद्वारे निवड करण्यात येईल. यातून पुन्हा चाळणी करून १ लाख उमेदवारांची मूल्यांकन चाचण्या,स्पर्धा व हॅकाथॉनच्या माध्यमातून निवड केली जाईल. अंतिम टप्प्यात २५,००० निवडक उमेदवारांना त्यानंतर तांत्रिक सहाय्य, आर्थिक मदत आणि प्रशिक्षण देऊन यशस्वी उद्योजक, स्टार्टअप्स तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. आयटीआय मध्ये तांत्रिक शिक्षणासोबत इतर अनुषंगिक व्यक्तीमत्व विकासाचे २० अभ्यासक्रम १५ सप्टेंबर पासून सुरू होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.



मंत्रालयात कौशल्य, रोजगार व उद्योजकता नाविन्यता विकास विभागाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री श्री. लोढा बोलत होते. यावेळी कौशल्य विकास आयुक्त लहुराज माळी उपस्थित होते.मंत्री श्री.लोढा म्हणाले की, महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ ला मान्यता देण्यात आली असून या धोरणाची अधिकृत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. हे धोरण महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राबविले जाणार आहे. या धोरणाद्वारे महाराष्ट्रात भारतातील सर्वात गतिशील व भविष्यवेधी स्टार्टअप केंद्र उभारण्याचा उद्देश आहे.या धोरणात पुढील पाच वर्षांसाठी महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन मांडण्यात आला असून १.२५ लाख उद्योजक घडवणे व ५०,००० स्टार्टअपना मान्यता देण्याचे उद्दिष्ट आहे. शहरी, ग्रामीण, महिला आणि युवा उद्योजकांसह सर्व क्षेत्रांतील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि वंचित समुदायांवर लक्ष केंद्रित केले जाईल. या धोरणातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे निवडलेल्या उमेदवारांना वित्तीय संस्थांच्या भागीदारीतून रु.५.०० लक्ष ते रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज साहाय्य दिले जाईल. पाच वर्षांच्या कालावधीसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उभारला जाईल. महाराष्ट्र स्टार्टअप वीक अंतर्गत निवड झालेल्या स्टार्टअप्सना राज्यशासन विभागांसोबत थेट काम करण्याची संधी मिळेल आणि रुपये २५ लाखांपर्यंतचे प्रायोगिक तत्वावर कार्यादेश दिले जातील.

# आईने मुलीला तर आत्याने भाच्याला दिले जीवनदान

**अमरावती (प्रतिनिधी)**– ८० व्या वर्षी ज्येष्ठ नागरिकाला ऑनलाईन प्रेम चांगलेच महागात पडले. प्रेम आणि खोट्या सहानभूतीच्या नावाखाली या ज्येष्ठ नागरिकाला सायबर संदर्भसेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी) गेल्या दोन दिवसांत दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यात आईने आपल्या मुलीसाठी मूत्रपिंड दान करून तिचे प्राण वाचवले, तर आत्याने भाच्याला जीवनदान दिले. विशेष म्हणजे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या तब्बल ५८ शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत.

आशना तहसीन ही १८ वर्षीय रुग्ण मुलगी. चांदूर बाजार तालुक्यातील देऊरवाडा या लहानशा गावची. गेल्या तीन महिन्यांपासून डायलिसीस सुरू होते, पण त्रास कमी होत नव्हता. मूत्रपिंड प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय असल्याचे डॉक्टरांनी तिच्या कुटुंबीयांना सांगितले. मुलीच्या पुढील भविष्याचा विचार करून आई रुबीना परवीन यांनी आपले एक मूत्रपिंड हे मुलीला देण्याचा निर्णय घेतला. सुपर स्पेशालिटी रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत ही शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात आली.

# काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांची ११ व १२ ऑगस्ट रोजी दोन दिवसांची निवासी कार्यशाळा

## प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने नवनियुक्त कार्यकारिणीची दोन दिवसांची निवासी कार्यशाळा पुण्याच्या खडकवासला येथील सोरिना हिल रिसॉर्ट येथे आयोजित केली आहे. दिनांक ११ व १२ ऑगस्ट रोजी ही कार्यशाळा असून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे या कार्यशाळेचे ऑनलाईन उद्घाटन करणार आहेत. दोन दिवसांच्या कार्यशाळेत प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

१० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून कार्यक्रमस्थळी कार्यशाळेसाठी निमंत्रीत पदाधिका–यांची नोंदणी होईल. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वा. सामुदायिक प्रार्थना होईल व सकाळी ९.३० वाजता अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या ऑनलाईन संबोधनाने शिबिराचा शुभारंभ होणार आहे. १२ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या मार्गदर्शनाने कार्यशाळेचा समारोप होईल. दोन दिवसांच्या कार्यशाळेत विविध चर्चासत्रेही होणार असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या राजकीय व्यवहार समितीची बैठकही होणार आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख पवन खेरा, राष्ट्रीय प्रवक्त्या व सोशल मीडिया विभागाच्या प्रमुख सुप्रिया श्रीनेत, इतिहासकार अशोक कुमार पांडेय, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, पत्रकार निरंजन टकले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यशाळेला संबोधित करणार आहेत.

# कुलगाम चकमकीत २ जवान शहीद तर १० जखमी, एक दहशतवादी ठार

**जम्मू–काश्मीर (प्रतिनिधी)**– कुलगाममधील अखल भागात दहशतवाद्यांशी सुरु असलेल्या चकमकीचा आज नववा दिवस आहे. रात्रभर परिसरात मोठ्या स्फोटांचे आणि गोळीबाराचे आवाज येत होते. या दरम्यान, काल रात्री झालेल्या गोळीबारात दोन लष्करी जवान शहीद झाले, तर इतर दोन सैनिक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

जम्मू काश्मीर येथील कुलगाम येथे भारतीय लष्कराची दहशतवाद्यांसोबत भीषण चकमक सुरु आहे, ज्यात आतापर्यंत, एका दहशतवाद्याला ठार करण्यात यश आले आहे. तर एकूण दोन सैनिक शहीद झाले असल्याचे वृत्त आहे. तर दहा सैनिक जखमी झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, घनदाट जंगल आणि नैसर्गिक गुहासारख्या लपण्याच्या ठिकाणांचा फायदा घेत किमान तीन किंवा त्याहून अधिक दहशतवादी अजूनही या ठिकाणी लपून बसले आहेत. ही चकमक गेल्या अनेक दशकांमधील सर्वात जास्त काळ चालणारी दहशतवादविरोधी कारवाई ठरली आहे.

# महाराष्ट्र शासनाचे २० वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई, (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासनाच्या २० वर्षे मुदतीच्या १००० कोटींच्या '७.१४ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४५' च्या ( दि.९ जुलै २०२५ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

१२ ऑगस्ट, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १२ ऑगस्ट, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई–कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई–कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई–कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १३ ऑगस्ट, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची काम काजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी २० वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ९ जुलै, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ९ जुलै, २०४५ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.१४ टक्के दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक ९ जानेवारी आणि ९ जुलै रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल. शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डङठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री–खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**


डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



# ऑनलाईन प्रेम महागात पडलं, 'शावी'च्या नावाखाली सायबर चोरट्यांकडून ९ कोटींची फसवणूक

**मुंबई (प्रतिनिधी)**– ८० व्या वर्षी ज्येष्ठ नागरिकाला ऑनलाईन प्रेम चांगलेच महागात पडले. प्रेम आणि खोट्या सहानभूतीच्या नावाखाली या ज्येष्ठ नागरिकाला सायबर चोरट्यांनी तब्बल ९ कोटी रुपयांना गंडवले.एकाच वेळी नाही तर या ना त्या कारणाने तब्बल ७३४ आर्थिक व्यवहार केल्यानंतर ही फसवणूक झाल्याची माहिती समोर आली आहे

खरंतर, एप्रिल २०२३ मध्ये त्या वृद्ध माणसाने फेसबुकवर 'शावी' नावाच्या महिलेला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. सुरुवातीला तिने ती नाकारली, पण काही दिवसांनी त्याच शावीने पून्हा रिक्वेस्ट पाठवली. दोघांमध्ये फेसबुक चॅट होऊ लागले. नकळत दोघांमधील मैत्री आणखी घट्ट होत गेली. दोघांचा व्हॉट्स अप संवाद सुरू झाला

शावीने स्वतःची ओळख करून देताना ती घटस्फोटित असून दोन मुलांची आई असल्याचे सांगितले. तसेच कौटुंबिक त्रास आणि ती आर्थिक संकटात असल्याची माहिती तिने नागरिकाला दिली. कालांतराने विविध कारणे देत तिने ज्येष्ठ नागरिकांकडून पैसे उकळण्यास सुरूवात केली. दोघांमधील अश्लील चॅटचा गैरफायदा घेऊन कालांतराने ज्येष्ठ नागरिकाला धमकावून त्याच्याकडून टप्पा टप्पाने ९ कोटी रुपये उकळण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिकाच्या मुलाला वडिलांच्या व्यवहारावर संशय आल्यानंतर हे सर्व प्रकरण समोर आले. आपली फसवणूक झाल्याची माहिती ज्येष्ठ नागरिकाला मिळाल्यानंतर त्याला याचा चांगलाच धक्का बसला. २२ जुलै २०२५ रोजी या प्रकरणी सायबर पोलिसात ज्येष्ठ नागरिकाने तक्रार नोंदवली होती. या तक्रारीच्या आधारे ६ ऑगस्ट रोजी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरूवात केली आहे.

ज्येष्ठ नागरिकाला सायबर चोरट्यांनी महिलेचं नाव वापरुन त्याशिवाय कौटुंबिक आर्थिक कारणं सांगत वेळोवेळी पैसे पाठवण्यास भाग पाडलं. सायबर चोरट्यांनी महिलेचं नाव वापरुन ज्या बँक खात्यांची माहिती पाठवली त्या खात्यावर संबंधित व्यक्तीनं पैसे पाठवले. जवळपास २२ महिने हा प्रकार सुरु होता. या २२ महिन्यात तबब्ल ७३४ व्यवहारांद्वारे ही रक्कम सायबर चोरट्यांनी मिळवली.

**टी.सी.हरवली**

माझी सुभाष दत्ता हनवते या नावाची इयत्ता १२ वी (आर्ट) ची टी. सी. नांदेड ते मुंबई दरम्यान रेल्वे प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–**
**रा कामळज, पो. कौडगोव, ता. लोहा, जि. नांदेड**
**मो. ९६१९२९८६४८**

**फरांदे होंडा** HONDA

वामन नगर, पुर्णा रोड,नांदेड.

**पाहिजेत**

सर्व्हिस ॲडव्हायजर - 02

सीआरई (फक्त महिला) - 04

स्पेअरपार्ट मॅनेजर - 01

(२ वर्षांचा अनुभव आवश्यक)

इंटरव्हुची वेळ

सोमवार, सकाळी ११ ते ५

मो.-9527595856

**Change In Name**

My old name is SYED ARIF which now I am changing as new name: SYED ARIF SYED BABU Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same Add:KELA MARKET ITWARA NANDED 431604 MO.9175403033

**Change In Name**

My old name is MOHAMMAD IKRAMFARAVALEET KHAN MD AYUBKHAN which now I am changing as new name: MOHAMMEAD IKRAM FARQUALLET KHAN Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same Add: Add:-

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक एनएनडी/३६८७१/१८६०/२३ फेरफार अहवालाअर्ज क्रमांक

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक,श्री सई अष्टविनायक ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था वरसरणी ता.लातूर रोड नांदेड

न्यासाचा पत्ता – घर नंबर ११–१–८८४/७० मेन लातुर रोड वसरणी नांदेड

अर्जदार – सुर्यकांत तुळशीराम पेठवडजकर,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड, हे वर

नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.–

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अक्र तपशील

१ लाईप टाईम मेंम्बरशिप अंदाजित मुल्य १०५७ २.एन.एस.सी अंदाजित मुल्ये १००० (अ) जंगम मिळकतः– रोख रु. २०५७/– मात्र (अक्षरी रुपये दोन हजार सत्तावन रूपये मात्र फक्त) स्थावर मिळकत (वर्णन) अ.क्र.– शहर किंवा गांव– सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.–क्षेत्र–मूल्यांकन– मुदत / कालावधी किंवा स्वरूप (ब) स्थावर मिळकत – रोख रु. /– मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल तर त्यांनी त्यांची लेखी तक्रार हि नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयात मिळेल अशा रितीने पाठवावे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत तक्रार न आल्यास कोणास काही सांगायचे नाही असे समजून चौकशी पुर्ण करण्यात येईल व अर्जाचा योग्य तो निकला दिला जाईल.माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.आज दिनांक ४/८/२०२५ रोजी दिले

**अधिक्षक**
**न्यास नोंदणी कार्यालय नांदेड**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६८ /२०२५ ललीता व इतर वि.निरंक

अर्जदार–१.ललीता भ्र.नरसिंग राचर्लावार वय–५० वर्षे, २.साईनाथ पि. नरसिंग राचर्लावार वय ३० वर्षे ३.कल्याण पि. नरसिंग राचर्लावार वय २७ वर्षे सर्व रा.कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड ह.मु.मधापुर मंडळ मकलूर जि.निझाबाद

विरूध्द

गैरअर्जदार– निरंक

विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत नरसिंग पि.गंगाराम राचर्लावार यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी अर्जदार क्र. २ व ३ हे मुलेआहेत.मयत आणि अर्जदार हे मौजे कुंलडवाडी ता. बिलोली येथील रहिवाशी होते. मयत नरसिंग पि.गंगाराम राचर्लावार यांचा मृत्यू दिनांक ८/१२/२०२४ रोजी झाला.मयताचे आई व वडील खुपवर्षापुर्वी मयत झाले.

मयताच्या पश्चात अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत नरसिंग पि.गंगाराम राचर्लावार यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १५/०९/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. १ ऑगस्ट, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**.आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्रीमती छायाबाई नागोराव इबिदार रा.बारूळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे वडील नामे रामराव बाबा इबिदार रा.बारूळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्याचे नाव–रामराव बाबा इबिदार रा.बारूळ ता.कंधार जि.नांदेड सदर व्यक्तीचा मौजे बारूळ ठिकाण दिनांक २६/८/१९८० या दिवशी मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणे साठी तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १/८/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

तरी जन्म/मृत्यू दिनांका बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा.दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपांचा विचार केला जाणार नाही

**तहसीलदार कंधार**

## जाहीर प्रगटन

क्र. २०२४ / उविअ / आरटीएस५९ / सालेगाव / सिआर – ०३

उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली दिनांकः– २९/०७/२०२५

अपीलार्थी :– १) सुगराबी भ्र. शेख मौला रा.बोधन जि. निझामाबाद २) अहेमदबी भ्र. मियापटेल रा. नायगाव खै. जि. नांदेड(मार्फत ड काझी सयद हाशमेल बिलाली )

विरूध्द

उत्तरार्थी :– १) हैदर पि. अब्दुल मजीद (वारस ) १ / १) पुतलीबेगम भ्र. शे. हैदर रा. सालेगाव ता. नायगाव खे. मो.क्र. ९५०२४२८१०१ १/२) अजमेरी भ्र. शे. सलीम रा. कॅनालकटटा ता. जि. निझामाबाद १/३) नसरीन बेगम भ्र. रफीक रा. रा. कॅनालकटटा ता. जि. निझामाबाद १/४ ) अखतरी भ्र. शे. सत्तार रा. कॅनालकटटा ता. जि. निझामाबाद २) शादुलपाशा अब्दुल मजीद (वारस) २/१) शे. बेगम भ्र. शादुलपाशा रा. पानसरे नगर नायगाव २/२) शे. असलम पि.शादुलपाशा रा. रा. पानसरे नगर नायगाव (९९६०८४७८००) २/३) शे. अखील पि.शादुलपाशा रा. रा. पानसरे नगर नायगाव (९८३४१००८९४) २/४) मुस्तफा पि.शादुलपाशा रा. पानसरे नगर नायगाव २/५) गोरीबी भ्र. अकबद रा. सालुरामंडळ बोधन २/६) कनीस फातेमा भ्र. तबरेज रा. इंदरनगर ता.जि. लातुर (८९९६३६४८६०) २/७) सना फातेमा भ्र मुस्तफा रा. गाडीपुरा, नांदेड २/८) सुलताना भ्र. शहादत रा. दर्गाजवळ ता. मुखेड जि. नांदेड ३) जाफर पि.अब्दुल मजीद ४)नाजर पि. अब्दुल मजीद ५) अहमद हुसेन अब्दुल माजीद सर्व रा. सालेगाव ता. नायगाव खै. जि. नांदेड

विषय:– महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपिल तहसिलदार नायगाव खै. यांचे आदेशान्वये घेण्यात आलेले मौ. सालेगाव ता.नायगाव खै. येथील जमीन गट क्र. ४२९ चे फेरफार क्र. १९०० दि. २३/०५/२०२३ रद्द करणे बाबत अपील .

तहसिलदार नायगाव खै. यांचे आदेशान्वये घेण्यात आलेले मौ. सालेगाव ता. नायगाव खै. येथील जमीन गट क्र. ४२९ चे फेरफार क्र.१९०० दि. २३/०५/२०२३ रद्द करणे बाबत अपील उपरोक्त अर्जदार व गैरअर्जदार यांना यादवारे कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय प्रकरणात अपीलाची सूनावणी खाली नमूद केलेल्या तारखेस तहसिल कार्यालय नायगाव खै. येथे ठिक दुपारी ०२.०० वा. ठेवण्यात आलेली आहे. त्या बाबत सदरची नोटीस प्रसिध्द करीत आहे. सर्व संबंधीतांनी स्वतः अथवा विधीज्ञा मार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे. जर उपरोक्त प्रकरणात आपण नमूद केलेल्या तारखेस उपस्थित राहून आपले म्हणने मांडले नाही, तर या बाबतीत आपले काहीही म्हणने नाही असे समजून पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. सूनावणीचा दिनांक :– १४/०८/२०२५ स्थळ :– तहसिल कार्यालय नायगाव खै.

**उपविभागीय अधिकारी बिलोली**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड


# गोदातीर समाचार


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




## आ. बोंढारकर यांच्या कार्यालयावर धडकला दिव्यांगांचा मोर्चा; दिव्यांग महिलांनी बांधली राखी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील खासदार आणि आमदार यांना मिळणाऱ्या स्थानिक क्षेत्रविकास निधीतील पाच टक्के निधी दिव्यांगांच्या कल्याणकारी योजनेवर खर्च करावा, असे आदेश असताना सुध्दा एकाही खासदाराने व आमदाराने आजपर्यंत खर्च केला नाही. त्यामुळे दिव्यांगांच्यावतीने खासदार व आमदार यांच्या कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढुन आंदोलन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आ. आनंदराव बोंढारकर यांच्या बोंढार येथील संपर्क कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

यावेळी आ. आनंदराव बोंढारकर यांनी दिव्यांगांच्या मागण्यांची दखल घेत आणि



दिव्यांग महिलांकडून राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. बेरोजगार दिव्यांग कल्याण कृती संघर्ष समितीच्यावतीने शनिवार, दि. ९ ऑगस्ट रोजी नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांच्या बोंढारमधील राजगड संपर्क कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

यावेळी आ. बोंढारकर यांची भेट घेत त्यांना राज्य शासनाच्या वतीने स्थानिक क्षेत्र विकास निधीतून त्यांच्या मतदारसंघातील दिव्यांगांसाठी पाच टक्के निधी खर्च करावा अशी मागणी करत विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावर आ. बोंढारकर यांनी प्रतिसाद देत मतदारसंघातील दिव्यांग नागरिकांची स्वतंत्र मतदाननिहाय यादी तयार करुन आपल्याला आलेल्या निधीतून पाच टक्के निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात येईल. काही मागण्या ह्या मंत्रालयात प्रलंबित आहेत त्या मागण्यांसाठी पाठपुरावा करावा अशी मागणी केली. यावर त्यांनी आगामी विधानसभेच्या अधिवेशनात प्रश्न विचारून तो सोडवण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर रक्षाबंधन सणा निमित्ताने त्यांनी दिव्यांग महिलांकडून राखी बांधून घेत रक्षाबंधन साजरा केला. मोर्चासाठी आलेल्या दिव्यांग नागरिकांना व महिलांना मिठाईचे वाटप करुन दिव्यांगांच्या आक्रोश मोर्चाच्या सर्वच मागण्या मान्य केल्याचे त्यांनी सांगत मतदारसंघातील एकही दिव्यांग हा लाभापासून वंचित रहाणार नाही असे आ. बोंढारकर यांनी आश्वासन दिले आहे. ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक साहेबराव रोकडे, सपोनि काळे व अधिकारी, अमलदार यांनी चोख बंदोबस्त लावण्यात आला होता.

## टाकाऊतून टिकाऊ पर्यावरणपुरक राख्या; पेनूरच्या विद्यार्थिनींचा अनोखा उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** – बहीण-भावाच्या पवित्र बंधनाचा सण रक्षाबंधन शनिवार, दि. ९ ऑगस्ट रोजी पारंपरिक पद्धतीने सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रक्षाबंधनचे औचित्य साधून नांदेड जिल्ह्यातील पेनूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनींनी टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ राख्या तयार केल्या आहेत. या राख्या पर्यावरणपुरक असल्यामुळे या राख्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या राख्या विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील वेगवेगळे कागद, तुकडे, रंग, कापड, कापूस, धान्य तांदूळ, गहू, विविध दाळी, मका, आईस्क्रीमच्या टाकाऊ काड्या, शर्टचे बटन, टेलरिंगचे उरलेले कापड, अशा विविध वस्तूंपासून विद्यार्थ्यांनी या राख्या तयार केल्या आहेत.

लोहा तालुक्यातील पेनूर येथील जि. प. हायस्कूलच्या गाईडच्या विद्यार्थिनींनी शाळेचे



मुख्याध्यापक प्रलोभ कुलकर्णी, शिक्षक मारुती सोने, मुरलीधर ढगे, मीनाक्षी गोखंडे, मदन गवते, चंद्रकांत एडके, गोवर्धन गवते, एजगे, राम पाटील गवते, प्रकाश आगलावे यांच्या मार्गदर्शनाखाली हा अनोखा पर्यावरणपूर्वक राख्यांचा उपक्रम राबवीत समाजामध्ये जनजागृतीचा संदेश दिला आहे.

रक्षाबंधनासाठी बाजारपेठेत अनेक प्रकारच्या फॅन्सी तसेच आकर्षक अशा राख्या विक्रीसाठी आलेल्या पाहायला मिळतात आणि त्या खरेदीसाठी मोठी गर्दीही होत असते. रक्षाबंधनाच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून आपल्या लाडक्या भाऊरायाला राखी बांधली जाते. या राख्यांच्या धाग्यावर विविध सामाजिक संदेश देण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने झाडे लावा झाडे जगवा, पाणी बचत, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता, मतदान जनजागृती, शिक्षणाचे महत्त्व, लेक वाचवा लेक शिकवा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, प्लास्टिक मुक्ती, पर्यावरणविषयक, देश भक्ती यासह अनेक असे महत्त्वाचे सामाजिक संदेश याद्वारे देण्यात आले आहेत.

गाईडच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या या पर्यावरणपुरक राख्या त्यांनी गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद येथे येत मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे, अधीक्षक शापोआ नीळकंठ पाचंगे, माधुरी जवाणे आदींच्या उपस्थितीत वडाच्या झाडाला राखी बांधून वृक्ष संगोपन करण्याची प्रतिज्ञा घेतली. या राख्या तयार करण्यासाठी शाळेतील स्नेहल जावळे, राजनंदा मुरडे, सुनंदा अचमारे, आशा भालेराव, प्रियंका कराळे, अनुसया चिल्कावार, लक्ष्मीबाई कोकणे, सुजाता कदम, सुरेखा सगर, विठ्ठल नरमिटवार, विश्वनाथ लिंबूरकर, केशव चव्हाण, जयवंत क्षीरसागर, अनुप कंदुलवार, नामदेव कोतवाल, आदींचे सहकार्य लाभले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते महावीर चौक मार्गावर १० ते १६ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते महावीर चौक मार्गावर १० ते १६ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले आहेत.

स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी शासकीय ध्वजारोहण समारंभ सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा-छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा-जिल्हाधिकारी कार्यालय-महात्मा गांधी यांचा पुतळा ते महावीर चौक या मार्गावर, १० ऑगस्ट रोजी २४ वाजता ते १६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या ००.०० वाजेपर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे.

या मार्गावर शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या काळात उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. संबंधितांवर नोटीस बजावून त्यांचे म्हणने ऐकून घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे.

## देशातील सर्वाधिक लांबीच्या दुसऱ्या क्रमांकाच्या राष्ट्रध्वजासह ‘तिरंगा रॅलीचे’ आयोजन

### भोकरच्या ‘श्री शाहू’ विद्यालयाकडून देशाला अनोखी मानवंदना

**भोकर (प्रतिनिधी)** – येथील श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे सातत्याने आपल्या आगळ्यावेगळ्या नवोपक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ‘शाहू परिवाराकडून’ भोकरकरांना राष्ट्रभक्तीची एक अनोखी मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. यासाठी शाहू परिवार सज्ज असून शाहूचे सुमारे तीन हजार विद्यार्थी या तिरंगा रॅलीत सहभागी होणार आहेत.

यंदाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता ही तिरंगा रॅली शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून निघून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी वंदन करून मुख्य रस्त्याने पुन्हा परत जाईल. लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव शिरीष देशमुख गोरठेकर यांच्या हस्ते तिरंगा रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात होईल. विशेष आकर्षण म्हणजे या रॅलीसाठी सुमारे एक हजार मिटर लांबीचा राष्ट्रध्वज तयार केला जात आहे. देशातील आजपर्यंतच्या इतिहासातील हा सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा राष्ट्रध्वज असणार आहे. यापूर्वी सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीचा राष्ट्रध्वज एका रॅलीत वापरला गेला. ’शाहू परिवाराकडून’ तयार केला जाणारा ‘तिरंगा’ एक हजार मिटर लांबीचा असेल.

केवळ ‘शाहू परिवारा’मुळेच देशप्रेमाने ओथंबलेला हा क्षण आणि सोहळा अनुभवण्याची सुवर्णसंधी भोकरकरांना लाभणार आहे, असे सर्वत्र बोलले जात आहे. देशातील आजपर्यंतच्या इतिहासातील हा सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा राष्ट्रध्वज शाहू परिवाराने तयार केला असल्याने हा नेत्रदीपक क्षण पाहण्यासाठी विद्यार्थी तसेच भोकरकर तालुक्यांमध्ये उत्सुकता लागली असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.

## मुखेडमध्ये विहिरीत पडून तर हदगावमध्ये सापाने चावा घेतल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील मुखेड आणि हदगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. यात मुखेड तालुक्यातील शेतकरी विहिरीत पडून तर हदगाव तालुक्यातील शेतकऱ्याचा विषारी सापाने चावा घेतल्याने मृत्यू झाला.

मुखेड तालुक्यातील सांगवी बेनक येथे राहणारा यादव माधव बामणे (वय ४४) हा ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी गाव शेजारी असलेल्या विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेला. पाणी शेंदत असताना त्याचा तोल गेला आणि तो विहिरीत पडला. त्याला पोहता येत नसल्याने त्याचा पाण्यात बुडवून मृत्यू झाला. ही बाब पाच ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. रेणुकाबाई यादव बामणे यांच्या माहितीवरून मुखेड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार कदम करत आहेत. तर दुसऱ्या घटनेत हदगाव तालुक्यातील शिरड येथे राहणारा शेतकरी साहेब पुंजाराम कल्याणकर हा आपल्या शेतात कामासाठी गेला होता. ४ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास त्याच्या पायाला विषारी सापाने चावा घेतला. लगेच त्याला नातेवाईकांनी तात्काळ उमरखेड येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. विश्वनाथ माधव कल्याणकर यांच्या माहितीवरून हदगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## क्रांतिकारक बिरसा मुंडा यांना अभिवादन करून जागतिक आदिवासी दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– जागतिक आदिवासी दिनानिमित्त आद्य क्रांतिकारक बिरासा मुंडा यांना अभिवादन करून साजरा करण्यात आला.

यावेळी आदिवासी मनेरवारलू समाजसुधारक मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय अन्नमावर, श्याम निलंगेकर, माजी कृषी संचालक सुरेश अंबुलगेकर, मधुकर उन्हाळे, माधवराव अडबलवाड, माधव रेडेवाड, प्रा. डॉ. प्रल्हाद इंगोले, संजय वाघमारे, सायलू मंकोड, यशवंत थोरात, राजू



पाळेपवाड, गंगाधर उपलवाद, माधव यमलवाड, अतुल पेदेवाड, रोहन कहाळेकर, श्रीनिवास इजपवाड, गिरीश भाटे, गिरीश बुरलेवाड, व्यंकट गंडदवाड, शंकर बंतलवाड, भागवत कोलगने, किरण पडलवार, सचिन कोटपेट, बालाजी कोरडवाड, ज्ञानेश्वर मरकंटे, लक्ष्मण दोंतुलवाड यांची उपस्थिती होती.

## अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिप्पर पकडले; तिघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– अवैध वाळूची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या दोन टिप्परला नांदेड ग्रामीण पोलिसांनी पकडले आहे. दोन्ही टिप्पर आणि वाळू असा १४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस गस्त घालत असताना ९ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर २ वाजेच्या सुमारास चंदासिंग कॉर्नर ते रमाई चौक या दरम्यान पोलिसांनी (एमएच०४-एफज- ७७६२) ची तपासणी केली. त्यामध्ये चोरटी वाळू भरलेली होती. तसेच निमजी रा. पिंपळगाव येथे पोलीस पथक गेले असताना (एमएच२९- सीएच-४१४६) या टिप्परची तपासणी केली. त्यातही चोरटी वाळू भरलेली होती. दोन्ही टिप्परमध्ये प्रत्येकी ६ ब्रास वाळू आणि दोन टिप्पर असा १४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी दोन गुन्हे स्वतः नांदेड ग्रामीण पोलिसांनी दाखल केले आहेत.

पोलीस उपअधिक्षक डॅनियल बेन, पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी व्यवहारे, डफडे, आडे, कल्याणकर, जमीर, कांबळे यांनी ही कार्यवाही केली आहे. या दोन प्रकरणात गजाननन दत्तराम घोरबांड रा. बोरगाव ता. लोहा, साईनाथ व्यंकटी काळे रा. किवळा ता. लोहा, व्यंकट उर्फ सौरभ आळणे रा. दगडगाव ता. लोहा, अजित गच्चे उर्फ बिट्या रा. बामणी ता. लोहा अशा चार जणांवर पुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**नांदेड** –देशात व राज्यातील ६ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याने प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संघटनेच्यावतीने राजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांना काळी राखी बांधून आंदोलन करण्यात आले. यावेळी महानगराध्यक्ष प्रितपालसिंघ शाहू, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव देशमुख, शहराध्यक्ष अजय हनुमंते, अनिल पाटील, अनिल शेट्टे, गजानन ठाकरे, दत्ता देशमुख, मलिंगा चाकोते, अर्जुनसिंघ जुन्नी, बालाजी येरलू, बालाजी हातागळे, सतिश कल्याणकर आदी उपस्थित होते. (छाया-सुनेगावकर)

## विश्वकर्मा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा आज सत्कार सोहळा

**लोहा (प्रतिनिधी)**– विश्वकर्मा सेवा संघाच्यावतीने विश्वकर्मा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सत्कार सोहळा रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी नांदेड शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

विश्वकर्मा समाजातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, समाजातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात अव्वल यावेत यासाठी दरवर्षी विश्वकर्मा सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन प्रेरणा व मान्यवरांकडून योग्य मार्गदर्शन या सोहळ्याच्या माध्यमातून दिले जाते. नांदेड जिल्ह्यातील खेड्यापाड्यांतील गुणवंत विद्यार्थी शेकडोंच्या संख्येने दरवर्षी या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एटीएस पोलीस निरीक्षक नांदेड रमाकांत पांचाळ, उद्घाटक मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश सुनील वेदपाठक हे राहणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून नांदेड महानगरपालिका नांदेडचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, प्रमुख अतिथी सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे हे असणार आहेत.

या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांना शिल्पकार गुरुवर्य सोपानकाका शूर दहावी, बारावी प्रथम दोन गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५५०० /- शिष्यवृत्ती, कै. धोंडिबाराव नागोबा पोलादवार शिष्यवृत्ती दहावी १, बारावी १, द्वितीय दोन विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३०००/- रुपये, कै. किशनराव मारुतीराव उजळंबकर तृतीय बक्षीस ११००/- रुपये, दहावी १ व बारावी १ व या सहाही विद्यार्थ्यांना कै. लक्ष्मणराव शिवलिंगराव देशमुख अंबुलगेकर यांच्या स्मरणार्थ स्कुलबॅग भेट देण्यात येणार आहेत.

या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये दहावी उत्तीर्ण ७५% व त्यापेक्षा अधिक गुणवत्ताधारक, बारावी ७०% व त्यापेक्षा अधिक गुणवत्ता धारक, यूपीएससी निवड विद्यार्थी २०२५, एमपीएससी निवड विद्यार्थी २०२४-२५, MBBS व BAMS निवड विद्यार्थी २०२५, इंजिनिअरिंग निवड विद्यार्थी २०२५ असणार आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी यासाठी नोंदणीसुध्दा केली आहे. या सत्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी गुणपत्रिकेसह उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. समाजासाठी व मानव कल्याणासाठी विशेष योगदान येणाऱ्या व्यक्तीस समाजभूषण पुरस्कार तर अत्यंत कठीण परिस्थितीत पतीच्या अकाली निधनानंतर आपल्या मुलांना शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग, व्यापार व राजकीय क्षेत्रात उत्तुंग झेप घेण्यासाठी सक्षम बनवणाऱ्या समाजातील आदर्श मातांना ‘हिरकणी पुरस्कार’ देऊन या सोहळ्यात सन्मानीत करण्यात येणार आहे. वधुपिता व वरपिता यांच्या सोयीसाठी उपवर-उपवधु परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी विश्वकर्मा समाजातील अधिकाधिक समाजबांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन विश्वकर्मा सेवा संघ शाखा लोहा च्यावतीने करण्यात आले आहे.

## दुचाकी चोरांची टोळी एलसीबीच्या जाळ्यात; सहा दुचाकी जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात दुचाकी चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या हाती लागली आहे. चोरट्यांकडून पोलिसांनी सहा दुचाकी जप्त केल्या आहेत. तर चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेवून त्यांच्याविरूध्द कारवाई करणे बाबत सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना दिल्या होत्या.त्यावरून पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सपोनि रवी वाहुळे, पोउपनि नागनाथ तुकडे, महेश कोरे व पोलीस अंमलदार यांची पथके तयार करून त्यांना वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने दि. ८ ऑगस्ट रोजी पथकाला गुप्त माहिती मिळाल्याने विजयनगर टोलनाका बिलोली येथे शुभम कांबळे रा. हसनाळ प.दे. ता. मुखेड याच्या ताब्यातून पो.स्टे. बिलोली, पो.स्टे. देगलूर व पो.स्टे. बोधन ग्रा. गुन्ह्यातील चोरलेला एकुण तिन स्प्लेंन्डर मोटार सायकल एकूण किंमत ८५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी मुद्देमालासह पो. स्टे. बिलोली यांचे स्वाधिन करण्यात आले.

तसेच पोउपनि महेश कोरे यांनी नांदेड न्यायालयाच्या पाठीमागील रोडवरून बालाजी दुलबाजी सोनटक्के वय २७ वर्षे, रा. वाहेगाव ता.जि. नांदेड, सय्यद इम्रान सय्यद गौस वय २१ वर्षे, रा. विष्णुपुरी नांदेड यांच्या ताब्यातून दोन मोटारसायकल किंमत ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी मुद्देमालासह पो. स्टे.भोकर व पो. स्टे. बारड यांचे स्वाधीन करण्यात आले. तसेच सपोनि रवी वाहुळे यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून लातूर फाटा, नांदेड येथून अक्षय रावसाहेब कांबळे वय २५ वर्ष, रा. मानसपुरी ता. कंधार, जि. नांदेड यांच्या ताब्यातून एक मोटारसायकल किंमत ३० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी मुद्देमालासह पो. स्टे. कंधार यांचे स्वाधिन करण्यात आला आहे. असे एकूण ४ आरोपींकडून वेगवेगळ्या गुन्ह्यातील एकूण दोन लाख रुपये किमतीच्या ६ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com